म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कादं. वा.
दा. क्र. ३८९८

उत्कर्ष वाचन

मार्गावरील खुणा

भाग १

(किशोरांकरितां)

:: लेखक ::

दि. ह. सहस्रबुद्धे
बी. ए.; बी. टी.; एल् एल्. बी.
शिक्षक,
नागपूर.

:: प्रस्तावना लेखक ::

य. बा. रानडे
सेवानिवृत्त प्राचार्य,
शिक्षण महाविद्यालय,
जबलपूर.

IRBK-0103818

मूल्य बारा आणे

उत्कर्ष वाचन

मार्गावरील खुणा

भाग १

(किशोरांकरितां)

:: लेखक ::

दि. ह. सहस्रबुद्धे

बी. ए.; बी. टी.; एल् एल्. बी.

शिक्षक,

नागपूर.

:: प्रस्तावना लेखक ::

य. बा. रानडे

सेवानिवृत्त प्राचार्य,

शिक्षण महाविद्यालय,

जबलपूर.

मूल्य बारा

ग्रंथ संग्रहालय

२५५३७

विभाग आ०

क्रमांक

नों. दि.

IRBK-0103818

* उत्कर्ष वाचन *

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

—प्रकाशक—

दि. ह. सहस्रबुद्धे,
डॉ. पालकर यांचे दवाखान्यासमोर
धरमपेठ,
नागपूर.

मुखपृष्ठावरील चित्र
म. कृ. केळकर,
मुंबई.

मुखपृष्ठ मुद्रक
शिवराज फाईन आर्ट
लिथो वर्क्स,
नागपूर.

ब्लॉक मेकर्स
देऊस्कर, ब्लॉक मेकर्स,
धंतोली, नागपूर.

मुद्रकः—नवसमाज लिमिटेड, नागपूर.

नोंद क्र. ३८९८

अनुक्रम 26932
विभाग आ. वा.
क्रमांक
नों. दि. 29/3/60

निवेदन

'मार्गावरील खुणा' हा माझा छोटासा भाषणसंग्रह प्रकाशित करतांना मला विशेष प्रकारचें समाधान वाटत आहे. शिक्षक या नात्याने गेलीं तेरा वर्षें एका शाळेंत विद्यार्थ्यांना त्यांचे प्रगतीचे मार्गावर सहाय्य करण्याचा माझ्या विचारांनुसार मी प्रयत्न केला. विशिष्ट परिस्थितींत कांही वर्षें या शाळेच्या अधिकारपदावरहि राहिलों. अधिक मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना सहाय्य करण्याची ही संधी समजून हाच प्रयत्न सामुदायिक प्रमाणावर केला. त्या प्रयत्नाचा एक भाग म्हणजे प्रार्थनेच्या वेळीं शिक्षकांनी दोन मिनिटें भाषणें देण्याचीं प्रथा हा होय.

विद्यार्थ्यांचें चारित्र्यसंवर्धनास व उच्च शालेय वातावरण निर्माण करण्यास या भाषणप्रथेचा फार उत्कृष्ट उपयोग झाला असें मला वाटतें.

या भाषणांपैकीं कांहीं मी दिलेलीं व प्रसंगानुसार जीं दिलीं असतीं अशीं कांहीं भाषणें इतर विद्यार्थ्यांकरितां प्रकाशित करावी असे विचार नेहमी मनांत घोळत. पण धीर होत नसे. वाटे हीं भाषणें प्रकाशित करण्याच्या योग्यतेचीं आहेत का ?

या विचारघोळांतून मुक्त होण्यासाठी मी श्री. बाबुराव रानडे (सेवानिवृत्त प्राचार्य, शिक्षण महाविद्यालय, जबलपूर) यांचेकडे धांव घेतली. शाळेंतील एक शिक्षक म्हणून त्यांचा माझा परिचय झाल्यापासून ते मजवर पितृवत् अकृत्रिम प्रेम करीत आहेत. शिक्षक, शाळा, शाळासंचालन व शिक्षणशास्त्र यांबाबत इतक्या अधिकारवाणीने जो अनुभवाचे बोल बोलूं शकतो, अशा अधिकारी शिक्षणशास्त्रज्ञाचा सल्ला घेण्याचें मी ठरविलें; व त्यांना ते सहाय्य करण्याची विनंती केली. त्यांनी भाषणांचे हस्तलिखित वाचून 'प्रकाशन करण्यास योग्य' असा शेरा दिला म्हणूनच हा भाषणसंग्रह प्रकाशित करण्याचें हें धाडस मी करीत आहे.

हें धाडस अनेक अर्थानें आहे. यांत मला खर्च करावा लागणारा पैसा व अशा पुस्तकांविषयींची आपली आवड असली तरी तें विकत घेण्याची शक्याशक्यता, हा भाग जरी तूर्त दूर ठेवला तरी ज्या अनेक शिक्षकपालकांकडून हें पुस्तक हाताळलें जाईल त्यांचें काय मत पडेल? हा मोठा प्रश्न अजून कायम आहेच. पण श्री. बाबुरावांच्या या वरील अभिप्रायानें शिक्षक पालकांसमोर मतांकरितां हें पुस्तक मांडण्याच्या लायकीचें आहे असा विश्वास वाटल्यामुळेच मी हें पुस्तक प्रकाशित करीत आहे.

खरेच सांगावयाचें म्हणजे श्री. बाबुराव यांनी या भाषणांबद्दल अनेक सूचनाहि केल्या आहेत व त्या मी अमलांतहि आणल्या आहेत. म्हणून हें पुस्तक आहे इतकें तरी उपयोगी झालें आहे. पण शिक्षक प्रथम वेळींच दुरुस्त्या तरी किती करणार व सूचना तरी किती देणार? आपल्या शिक्षकांचा हा रोजचाच अनुभव नाहीं कां? सगळ्याच सूचना एकदम देऊं नयेत व दिल्या तरी विद्यार्थ्यांचें मूळ लेखनांत त्यांचे म्हणून जें कांहीं बनलेलें असतें तें कांहीं एकदम दुरुस्त होत नाही. याहि भाषणाचें तसेंच आहे. जें दुरुस्त व फार योग्य झालें असेल तें श्री. बाबुरावांचें, व जें दुरुस्त व्हावयाचें राहिलें असेल तें माझें, अशी स्थिति आहे. शिवाय पितृवत् प्रेम मातेच्या प्रेमाइतकें आंधळें नसलें तरी थोडेफार असतेच. त्यामुळेंहि श्री. बाबुरावांना या भाषणांतील कांहीं दोष दिसले नसण्याचा संभव आहे. तज्ज्ञ शिक्षकांनी व पालकांनी ते दाखवून अशीं भाषणें अधिक उपयुक्त व अचूक मार्गदर्शक करण्यास मदत करावी अशी मी प्रार्थना करतो.

आज दिलें तें गोड करून घ्यावें व पुढील प्रयत्नास दोष दाखवून उत्तेजन द्यावे ही विनंती.

भाषणें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावयाचीं म्हणजे मोठाच प्रश्न. तरी पण तो इतक्या उत्कृष्ट प्रकारें सोडविण्यास ज्या अनेक हितचिंतकांनी व आप्तांनी अनेक प्रकारें मला मदत केली त्यांचे प्रति मी आपली कृतज्ञता व्यक्त करतो.

विजयादशमी

१९५१

दि. ह. सहस्रबुद्धे.

प्रस्तावना

शाळेचें दैनंदिन कार्य कसें सुरूं करावें यासंबंधी दोन प्रकार प्रचलित आहेत. घड्याळांत अकरा वाजले कीं शाळेची घंटा वाजावी व विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गात जाऊन बसावे आणि वर्गात शिक्षक आल्यावर शालेय अभ्यासाला सुरवात व्हावी हा एक प्रकार, तर शाळेंतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व प्रमुख अध्यापक यांनी एकत्र जमावें, शाळेने सामुदायिक प्रार्थना व वंदन करावें व प्रार्थनोत्तर पवित्र व उच्च वातावरणांत शालेय कार्य सुरूं व्हावे हा दुसरा प्रकार.

दुसरा प्रकार अर्थातच अधिक चांगला. त्यांत प्रमुख अध्यापकाची जबाबदारी साहजिकच जास्त. शाळा या नात्याने एकत्र जमून शालेय कार्याचे प्रारंभी शाळेंत पवित्र व उच्च वातावरण निर्माण करण्याचें कार्य या छोट्याशा प्रार्थना–समारंभाने झालें पाहिजे. साहजिकच तो समारंभ इतका शिस्तबद्ध व गांभीर्यपूर्ण व्हावयास पाहिजे कीं त्याचा परिणाम विद्यार्थ्यांचें मनावर कायम राहावा.

रोज रोज एकत्र जमावयाचें, एकाच ठरीव प्रकारें उभे राहावयाचें, प्रार्थना म्हणावयाची, वर्गात जावयाचें. हा रोजचा प्रकार झाल्यामुळे त्यांत एक ठरीव यांत्रिकपणा येतो व त्यांतील जीवंतपणा नाहीसा होऊं लागतो असा अनुभव कित्येक ठिकाणीं येतो.

या प्रकारांत ठरीवपणा येऊं न देतां त्यांत जीवंतपणा कायम राखण्याचा एक उपाय म्हणजे प्रार्थनेपूर्वी शाळेंतील निरनिराळ्या शिक्षकांनी आपल्या अनुभवानुसार व विचारानुसार (पण निश्चित उद्देशाने) विद्यार्थ्यांच्या विचारांना उत्कर्षप्रवण कलाटणी देणारें भाषण करणें हा होय.

विद्यार्थ्यांविषयीं कळकळ वाटणाऱ्या शिक्षकाला आपल्या विद्यार्थ्यांना काय सांगूं व किती सांगूं असें सारखे वाटते. त्याला अशी संधी मिळाली तर लांबच लांब भाषण करण्याचा व सगळें कांहीं सांगून टाकण्याचा मोह आवरत नाही. प्रार्थनेच्या वेळेचें भाषण अतिशय छोटें व तेवढ्या वेळांत विद्यार्थ्यांना उच्च वातावरणांत नेऊन सोडणारें असावें.

हें धाडस अनेक अर्थानें आहे. यांत मला खर्च करावा लागणारा पैसा व अशा पुस्तकांविषयींची आपली आवड असली तरी तें विकत घेण्याची शक्याशक्यता, हा भाग जरी तूर्त दूर ठेवला तरी ज्या अनेक शिक्षकपालकांकडून हें पुस्तक हाताळलें जाईल त्यांचें काय मत पडेल? हा मोठा प्रश्न अजून कायम आहेच. पण श्री. बाबुरावांच्या या वरील अभिप्रायाने शिक्षक पालकांसमोर मतांकरितां हें पुस्तक मांडण्याच्या लायकीचें आहे असा विश्वास वाटल्यामुळेच मी हें पुस्तक प्रकाशित करीत आहे.

खरेच सांगावयाचें म्हणजे श्री. बाबुराव यांनी या भाषणांबद्दल अनेक सूचनाहि केल्या आहेत व त्या मी अमलांतहि आणल्या आहेत. म्हणून हें पुस्तक आहे इतकें तरी उपयोगी झालें आहे. पण शिक्षक प्रथम वेळींच दुरुस्त्या तरी किती करणार व सूचना तरी किती देणार? आपल्या शिक्षकांचा हा रोजचाच अनुभव नाहीं कां? सगळ्याच सूचना एकदम देऊं नयेत व दिल्या तरी विद्यार्थ्यांचें मूळ लेखनांत त्यांचे म्हणून जें कांहीं बनलेलें असतें तें कांहीं एकदम दुरुस्त होत नाही. याहि भाषणाचें तसेंच आहे. जें दुरुस्त व फार योग्य झालें असेल तें श्री. बाबुरावांचें, व जें दुरुस्त व्हावयाचें राहिलें असेल तें माझें, अशी स्थिति आहे. शिवाय पितृवत् प्रेम मातेच्या प्रेमाइतकें आंधळें नसलें तरी थोडेफार असतेच. त्यामुळेंहि श्री. बाबुरावांना या भाषणांतील कांहीं दोष दिसले नसण्याचा संभव आहे. तज्ज्ञ शिक्षकांनी व पालकांनी ते दाखवून अशीं भाषणें अधिक उपयुक्त व अचूक मार्गदर्शक करण्यास मदत करावी अशी मी प्रार्थना करतो.

आज दिलें तें गोड करून घ्यावें व पुढील प्रयत्नास दोष दाखवून उत्तेजन द्यावे ही विनंती.

भाषणें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावयाचीं म्हणजे मोठाच प्रश्न. तरी पण तो इतक्या उत्कृष्ट प्रकारें सोडविण्यास ज्या अनेक हितचिंतकांनी व आप्तांनी अनेक प्रकारें मला मदत केली त्यांचे प्रति मी आपली कृतज्ञता व्यक्त करतो.

विजयादशमी

१९५१

दि. ह. सहस्रबुद्धे.

प्रार्थनेचे वेळीं शाळेंतील लहान मोठे सर्वच विद्यार्थी हजर असतात. शिक्षक सांगणार तें सर्वच लहान मोठ्या विद्यार्थ्यांना समजेल असें व सर्वांच्याच मनाची पकड घेईल असें असावें.

भाषणाचें तात्पर्य इसापच्या गोष्टींसारखे शेवटीं घालावयाचें, कीं विष्णुशर्माच्या हितोपदेशाप्रमाणे सुरवातीस सांगावयाचें, कीं स्पष्टपणें न सांगतां केवळ सुचवावयाचें किंवा भाषणांत किंवा गोष्टींत असें गोवावयाचें, या सर्व गोष्टींची योजना शिक्षकानें अगोदरच विचारपूर्वक करावयास हवी. शिक्षकाची भाषा साधी, सरळ असावी. प्रसंगीं संभाषणात्मक असणेंहि शक्य आहे. पण ही सर्व योजना पूर्वीं झालेली असली पाहिजे तरच या भाषणांचा इष्ट तो परिणाम होईल. हीं रोज रोज होणारी भाषणें, पण त्यांत भिन्न वक्ता व विषय विविधता यांमुळें ठरीवपणा येण्याचा संभव नसतो. शिवाय तीं ऐकत असतां शिक्षक आपणांशींच आपलेपणानें बोलत आहे असें विद्यार्थ्याला वाटलें तर हीं छोटीशीं भाषणें विद्यार्थीमनाची विलक्षण पकड घेतात.

श्री. सहस्रबुद्धे यांनीं आपल्या भाषणांचें हस्तलिखित मला दाखविलें. अशा प्रार्थना भाषणांत आवश्यक असे अनेक गुण व प्रकार मला त्यांत आढळले हें मला नमूद करण्यास आनंद वाटतो.

आपल्या व्यवसायाबद्दल आंतरिक कळकळ वाटणारा शिक्षक कोठेहि गेला व त्यानें कांहीहि नवीन पाहिलें, वाचलें, कीं ती माहिती व तो अनुभव विद्यार्थ्यांना कशा रीतीनें उपयुक्त होईल याचा तो विचार करीत असतो. ही माहिती, विचार व अनुभव विद्यार्थ्यांना सांगून त्यांच्या सर्वांगीण विकासास मदत करावी अवी तळमळ या शिक्षकास असते. अशा तळमळीच्या ध्येयनिष्ठ शिक्षकांपैकी श्री. सहस्रबुद्धे हे एक शिक्षक आहेत. त्यांनी त्यांना सुचलेले विचार व अनुभव या भाषणांतून मोठ्या कुशलतेनें विद्यार्थ्यांना सांगितले आहेत.

श्री. सहस्रबुद्धे यांनी हा भाषणसंग्रह छापून प्रसिद्ध केला तर विद्यार्थ्यांना वाचावयास देण्याकरितां एक उपयुक्त लहानसें पुस्तक तयार होईल अशी मला खात्री आहे.

जबलपूर
१२-८-१९५१

प. भा. रानडे.

अनुक्रम

अनुक्रम	विषय		पृष्ठ
१	उत्कर्षशील शाळा	....	१
२	पाऊस आला नि खेळ रंगला.	...	४
३	आपली समजून काळजी घ्या, दुसऱ्याची समजून वापरा.		६
४	मी ना—गपू—रला जाईन.	...	८
५	त्रिवार दिलेत, सहस्रशः घ्या.	....	९
६	'चि. × × × आजारीं—.' कां म्हणून ?	...	१०
७	बागुलबोवाशीं लढाई.	....	१२
८	उंदीरमामा, मनी मावशी व मुंगी.	....	१४
९	खुल्या वाचनालयांत.	....	१६
१०	सणासुदी नव्हे, सदा.	....	१७
११	थोरपणाचे वाटेवर.	...	१९
१२	सोप्या प्रयोगांत मोठा अर्थ.	....	२१
१३	छोटी सेवा आणि किंचित् स्मित.	....	२३
१४	म्हशीला बडगा आणि मुलांना ?	...	२३
१५	बकरीचा कुत्र्यांवर हल्ला !	....	२५
१६	मांजराच्या घरीं गाय नाहीं पण—?	....	२६
१७	हातपकडींची हालचाल.	...	२७
१८	तुम्ही सांगाल ते प्रश्न !	....	२९
१९	बिटका शरीफ आणि उंच बॅनर्जी मुके कां ?	...	३१
२०	शालेय कार्याचें विविध स्वरूप.	...	३३
२१	भिंतीवर 'साने.'	....	३७
२२	आम्ही राष्ट्रीय स्मारकें चिताडावींत कां ?	....	३९
२३	बागेंत मुलें आणि झाडांवर फुलें.	....	४०
२४	'घाईघाईंत झालें, सर.	....	४१
२५	दोन वाटा फुटतात तेथें ?	...	४३
२६	पुढील वर्षी खेळू आणि जिंकू.	...	४४
२७	संपन्न आणि सुडौल शरीर.	....	४६



आज दोन महिन्यांनी आपण सर्वजण असे एकत्र आपल्या शाळेंत एकमेकाला भेटत आहो. आपले प्रिय मित्र इतक्या दिवसांनी भेटल्यावर साहाजिकच प्रत्येकाजवळ दुसऱ्याला सांगण्यासारखें कितीतरी असतें, व तें केव्हां एकदा मी सांगून टाकतो असें आपणाला वाटतें आपण दोन महिने काय केलें, कोठे गेलो, काय पाहिलें, तें पाहून आपणाला काय वाटलें, कोणतीं पुस्तकें वाचलीं कोणतीं आवडलीं, कोणत्या पुढाऱ्यांचीं भाषणें ऐकलीं, किती तरी गोष्टी दुसऱ्याला सांगाव्या असें तुम्हांला वाटत असेल आणि आतां यापुढें तुम्ही एकमेकास सांगालहि. त्या तुम्ही जरूर सांगा आणि ऐका;

त्यामुळें तुमच्या ज्ञानांत किती तरी भर पडेल, आणि तुम्हालाहि पुढील सुट्टयांचे वेळीं स्वतःचे बेत आंखायला या माहितीचा भरपूर उपयोग होईल.

उन्हाळयाचे सुट्टींतील आपल्या शाळेच्या दृष्टीने एक महत्वाची गोष्ट तुम्हाला सांगावयाची म्हणजे मॅट्रिकच्या परीक्षेंत आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करून आपल्या शाळेच्या उज्ज्वल परंपरेंत



भर घातली आहे ही होय. तुम्ही ही परंपरा अधिकाधिक उज्ज्वल करालच असा मला पूर्णविश्वास आहे.

तुमच्याबरोबर येथे अगदीं अनोळखी अशी कांहीं मुलें उभीं आहेत. तीं या नवीन इंग्रजी शाळेंत अगदी प्रथमच आलीं आहेत. तीं नवीन असल्यामुळें त्यांना जरा बुजल्या बुजल्यासारखे वाटत असेल. त्यांच्याशी गोड



बोलून आणि बरें वागून त्यांची भीति घालविणें हे तुमचें कर्तव्य आहे. शाळेविषयीं त्यांना व त्यांच्या पालकांना आपलेपणा वाटणें, हें तुम्ही त्यांच्याशी कसें वागतां यावर अवलंबून आहे. तुमच्या वागण्यामुळें त्यांच्या मनांत या आपल्या शाळेविषयीं लवकरच आपुलकी उत्पन्न होऊन तेहि, तुमच्या बरोबर स्वतःची उन्नति करून घेण्यास शाळेच्या निरनिराळ्या उत्कर्ष-कार्यक्रमांत उत्साहानें लवकरच भाग घेऊं लागतील व वरपासून खालपर्यंत सर्व विद्यार्थ्यांत एकसंघी बंधुभाव दिसूं लागेल असा मला विश्वास वाटतो.

गुण शोधून ते वाढविते,
अवगुण शोधून ते दूर करते,
सर्वांगीण प्रगतीस सहाय्य करते,
ती ही आमची शाळा.

२

काल संध्याकाळीं शाळा सुटल्यावर घरीं जात होतो. पाऊस पडत होता. ज्या रस्त्यानें मी घरीं जातो त्या रस्त्याच्या बाजूला खेळण्याचे मैदान आहे. त्या मैदानावर पावसांत मुलें फुटबॉल खेळत होतीं. पावसांत भिजत होतीं पण खेळत होतीं. पावसाची एखादी सर

जोरांत आली की त्यांच्या 'किक्' मारण्याला व खेळण्याला आणखी जोर येत होता. मला त्यांचा हा खेळ व उत्साह पाहून फार बरें वाटलें.

शाळा उघडल्याबरोबर मुलांची खेळण्याची सोय व्हावी म्हणून उन्हाळयाचे सुट्टींतच १५–२० फुटबॉल शाळेनें खरेदी करून ठेवले व मुलांनीं ते आपल्या गतवर्षीच्या पद्धतीप्रमाणे न्यावेत असें एकदां सांगण्यांतहि आलें. पण चपराशाला विचारलें तर तो म्हणतो, 'चारच फुटबॉल खेळायला गेले आहेत.' 'असें कां ?' चपराशी सांगतो, "मुलें म्हणतात, 'खेळावें

असें वाटतें पण पावसांत काय खेळायचे'; पालक पावसांत खेळायला परवानगी देत नाहींत म्हणून मुलें फुटबॉल नेत नाहींत".

पहिला पहिला पाऊस पडतांना लहान लहान मुलें पावसांत आनंदानें बागडतांना मीं पाहिलीं आहेत. ऊन पावसाचा खेळ चालला असतां मुलांना किती आनंद होतो · हेंहि मीं पाहिलें आहे. मग शाळेंत येणाऱ्या तुम्हां मुलांचा हा उत्साह कां नष्ट झाला ? मला नीटसें समजत नाहीं. कांहीं गरीब मुलांना घरीं गेल्यावर घालायला दुसरे कपडे नसतील, कांहींना कदाचित् कांहीं काम एखादे दिवशीं असेल, हें खरें; पण बाकी सर्व मुलें खेळण्याचें मैदानांवर पावसाळ्यांत हजर कां नसतात तें मला नीटसें समजत नाहीं. पावसांत खेळल्याने तुम्ही आजारी पडाल ही भीति तुम्हाला किंवा तुमच्या पालकांना वाटत असेल. त्यामुळे तुमचे पालक तुम्हाला पावसांत खेळायला जाण्यास मनाई करतात असें, चपराशानें, माझ्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरावरून समजतें; पण हें कारण मला तितकेसें पटत नाहीं. तुम्हाला पाऊस पडत असला तरी खेळावें असें वाटतें ना ? मग 'इच्छा तेथे मार्ग' (where there is a will, there is a way) ही म्हण तुम्ही सर्वजण शिकला आहांत. तिचा अर्थहि तुम्हाला माहीत असेल, तिचें स्पष्टीकरणहि तुम्हाला करतां येत असेल, पण त्या म्हणीप्रमाणे तुमच्या हातून कृति होतांना दिसत नाहीं, त्याअर्थी ती म्हण तरी खोटी आहे किंवा पाऊस पडत असला तरी खेळायला जाण्याची तुमची उत्कट इच्छा आहे हें म्हणणें तरी खोटें आहे. पहा यांतील काय खोटें आहे तें. जर उत्कट इच्छा असेल तर सुचेल तुम्हाला मार्ग. मला विचाराल तर मीहि सांगेन. पाहिजे तर तुमच्या पालकांनाहि भेटेन. पण कांहीं झालें तरी मैदानावर उत्साहाने भर पावसांत खेळणारीं दमदार मुलें पाहिजेतच.

तींच मुलें पुढेंहि उत्तम खेळतील व पुढील जीवनांतहि उगाचच भेडसावणाऱ्या बागुलबोवांना निर्भयपणें तोंड देतील.

३

पहांटे मोकळचा हवेंत दूर फिरायला जावयाचा माझा नियम आहे ,हें मी तुम्हाला सांगितलेंच आहे. आज सकाळीं बाहेर पडलो व थोडासा चालून गेलो. पुढें जातो तों जवळ जवळ अर्धा फर्लांग रस्ता ओला झालेला दिसला. हें पाणी कोठलें? पाऊस तर पडला नव्हता मग हा रस्ता ओला कसा झाला? असे विचार माझ्या मनांत आले. पुढें चालूं लागलो. पांच सहा घरें गेल्यावर एका आवारांत टाकें दिसलें. तें पाण्यानें तुडुंब भरलें होतें—व त्यांतून पाणी बाहेर वाहत होतें. या वाडचांत पांच सहा बिऱ्हाडें आहेत. या सर्वच घरांतील माणसें या टाक्यांतील पाण्याचा म्हणजेच नळाचा उपयोग करतात. पण नळ बंद कोणी करायचा ?



माझ्या मनांत विचार आला—सार्वजनिक वस्तु म्हणजे त्या वस्तूचा सर्वांनी उपयोग करायचा, पण तिची काळजी मात्र कोणी घ्यायची नाहीं; असा अलीकडे अर्थ होऊं लागला आहे. सार्वजनिक नळ, सार्वजनिक संडास, रस्ते, आगगाडीचा डबा, आगगाडीचे डब्यांतील विजेचा पंखा, वाचनालयांतील वर्तमानपत्रें, ग्रंथालयांतील पुस्तकें, इत्यादि कित्येक गोष्टी मला एकामागून एक आठवल्या. यांचा उपयोग मात्र आपण करतो पण त्याबाबतची योग्य काळजी मात्र घेत नाहीं.

प्रत्येक सार्वजनिक वस्तूचा उपयोग ती वस्तु दुसऱ्याची आहे असें समजून करायला पाहिजे व तिची काळजी मात्र ती वस्तु आपली आहे असें समजून घ्यायला पाहिजे.

सार्वजनिक वस्तूच्या उपयोगाबाबत ही दृष्टी असावी असे मला वाटते.

४

शाळेच्या कार्यालयांत आलेल्या मुलांच्या वह्या काल मी तपासत बसलो होतो. तपासतां तपासतां माझ्या मनांत एक विचार आला. कित्येक मुलें घरून निघण्यापूर्वी आपला शर्ट कोट चांगला स्वच्छ आहे किंवा नाहीं इकडे लक्ष देतात, कित्येक जण तर घरांतून निघण्यापूर्वी आरशांत आपला पोशाख चांगला आहे ना हें पाहतात. हें त्यांचें करणें गैर आहे असें मला वाटत नाहीं. आपण चांगले दिसलो पाहिजे असें तुम्हाला वाटतें, हें अगदीं योग्य आहे.

हें जसें तुम्हाला स्वतःबद्दल वाटतें तसें तुम्हाला तुमच्या हस्ताक्षराबद्दल कां वाटूं नये याचें मला आश्चर्य वाटत आहे. तुम्ही जसें चांगलें दिसला पाहिजे असें तुम्हाला वाटतें तसेंच तुमचें हस्ताक्षरहि चांगलें दिसलें पाहिजे असें तुम्हाला कां वाटूं नये ?

शाळेंतील परीक्षा उत्तीर्ण होणें एवढेंच तुमचें ध्येय आहे असें मानलें तरी ती परीक्षा उत्तीर्ण होण्यास चांगल्या हस्ताक्षराची व चांगल्या लिहण्याची किती तरी मदत होते. तुम्हाला माहीतच आहे कीं तुमची परीक्षा लेखी होते आणि तुमच्या उत्तरपत्रिका वाचूनच परीक्षक तुम्हाला गुण देतात.

तुमच्या उत्तरपत्रिकेचें पहिलें पान उलटल्यावरोबर 'किती छान हस्ताक्षर आहे !' असे तुमच्या परीक्षकांस वाटले पाहिजे. वाईट हस्ताक्षर व तेंहि गिचमिड लिहलेलें अशी तुमची उत्तरपत्रिका पाहिली कीं त्यांचें मत तुमच्याविषयीं प्रतिकूल झालेंच म्हणून समजा.

आपलें हस्ताक्षर चांगलें असावें असें सर्वच मुलांना वाटतें पण चांगलें हस्ताक्षर म्हणजे काय हें पुष्कळ मुलांना नीटसें समजत नाहीं. त्याकरितां मी सर्वात सोपा उपाय सांगतो. तुमचें मराठीचें जें पाठ्य-पुस्तक आहे त्यांतील अक्षरांकडे लक्षपूर्वक पहा; त्यामुळे वळणदार अक्षर म्हणजे काय हें समजण्यास तुम्हाला मदत होईल.

उत्तम वळणदार अक्षर काढतां आल्यास चांगलेंच पण साधारण बरें अक्षर असलें तरी लिहीत असतां कोणत्या गोष्टींकडे लक्ष तुम्ही ठेवलें

पाहिजे हें तुम्हाला सहज व स्पष्टपणें समजावें म्हणून तुम्ही सर्वसाधारणपणें ज्या चुक्या करता त्या दाखविण्याकरितां आज फलकावर एकच वाक्य निरनिराळ्या प्रकारें लिहलें आहे. त्या प्रत्येक प्रकारांत कोणती चुकी केली आहे तें पहा व शेवटी तेंच वाक्य कसें लिहलें आहे तें पहा, म्हणजे आपली उत्तरपत्रिका किंवा पत्र चांगलें दिसण्याकरितां आपण आपलें हस्ताक्षर फारसें चांगलें नसलें तरी, लिहतांना कोणत्या गोष्टीकडे लक्ष ठेवलें पाहिजे हें तुम्हाला समजेल हें केवळ लिहण्याच्या पद्धतीच्या दृष्टीनें मी सांगितलें. इकडे लक्ष द्याच पण अक्षर वळणदार सुडौल काढता येण्याकडेहि लक्ष द्या.

मीना गपू रला जाईन

मी नागपरला जाईन.

मी नागपूरला जाईन.

मी नागपूरला जाईन.

मी नागपूरला जाईन.

मी नागपूरला जाईन.

शेजारच्या मुलाजवळ वस्तू आहे,
म्हणून, ती मला पाहिजे,
असें तुम्हाला वाटते ना ?
दुसरा करतो,
म्हणून तें आपण करावे
असें तुम्हाला वाटते ना ?
मग
तो कोणकोणत्या चांगल्या गोष्टी करतो,
त्या पहा.
चांगले करण्याचा व चांगले होण्याचा
अगदीं सोपा उपाय आहे हा.

काही दिवसांपूर्वी एका शाळेचें 'प्रभा' नांवाचें मासिक वाचत होतो त्या मासिकांत एका विद्यार्थिनी लेखिकेने एका झाडूवाल्याला त्रिवार धन्यवाद दिले होते. तिच्या शाळेच्या आवारांत इकडे तिकडे पडलेले कागदाचे चिटोरे, केळचांचीं सालपटें, बोरांच्या बिया, आइसफ्रूटच्या काड्या अगदीं वेळचे वेळीं उचलून टाकून आवार केव्हाहि अगदीं स्वच्छ ठेवण्याचा या झाडूवाल्याचा नियम आहे आणि म्हणूनच या सेवातत्पर झाडूवाल्याला त्याच्या सेवातत्परतेबद्दल या लेखिकेने त्रिवार धन्यवाद दिले होते.

काल याच शाळेंत व्याख्यान देण्याचा माझ्यावर प्रसंग आला. मी व्याख्यानांत या छोट्याशा लेखाची आठवण सर्वच विद्यार्थिनींना करून दिली आणि म्हटलें, "तो झाडूवाला आपलें काम तत्परतेने व दक्षतेने करतो याबद्दल तुम्ही त्याला धन्यवाद देता व त्याचें कामाची प्रशंसा करता, हें वाचून मला फारच समाधान वाटले, कारण या गरीब बिचाऱ्यांच्या कामाची एवढी प्रशंसा करणारेहि सहसा कोणी सांपडत नाहीं. तुम्ही ती करता या तुमच्या गुणग्राहकतेबद्दल मी तुमचें अभिनंदन करतो.

पण रागावूं नका. मला एक प्रश्न विचारावा असें वाटतें. 'त्या त्या ऋतूंत बोराच्या बिया, जांभळाच्या आठळ्या, केळचांचीं सालपटें व वर्षभर नेहमीच कागदाचे चिटोरे शाळेच्या आवारांत, इकडे तिकडे चोहीकडे टाकते तरी कोण?

त्या झाडूवाल्याला त्रिवार धन्यवाद देण्यांत तुम्ही दाखविलेली गुणग्राहकता प्रशंसनीय आहे, पण शाळेच्या आवारांत इतस्ततः बिया, आठळ्या न पडल्या तर ते तुम्हाला अधिक भूषणास्पद नाहीं कां होणार? या गोष्टी ठरीव ठिकाणीं टाकण्यांची खबरदारी तुम्ही घेतली व आवार सदा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी तुम्ही पार पाडलीत तर मीच काय सर्वच शिक्षक व नागरिक मनापासून तुम्हाला त्रिवारच नव्हे सहस्त्रशः धन्यवाद देतील. तुम्ही मुलींनी इतर कित्येक शाळांच्या मुलींना हें उत्कृष्ट अनुकरणीय उदाहरण घालून दिलें तर किती अभिमान वाटेल आम्हाला तुमच्याबद्दल."

हे जुलै महिन्याचे दिवस आहेत. या दिवसांत आपल्या प्रांतांत दोन रोग अगदीं हटकून होतातच. कॉलरा आणि आंव हे ते दोन रोग होत. तुम्ही वर्तमानपत्रांत वाचलें असेल, घरीं शेजारीं पाजारीं तुम्ही ऐकलेंहि असेल नव्हे, तुमच्या ओळखीच्या मुलांपैकी कोणी यांपैकी एखाद्या रोगानें आजारीहि असेल. आंवेमुळे आपल्याला कित्येक दिवस आपला अभ्यास व कामधंदा करतां येत नाहीं. कॉलऱ्यामुळें तर आपल्या देशांत या एक दोन महिन्यांत किती तरी लोक दगावतात. वर्षानुवर्षें अगदीं ठरीव वेळीं येणाऱ्या या रोगांचा प्रतिबंध आपण अजून करूं शकलो नाहीं. याचें कारण तुम्हाला माहित आहे कां ?

बऱ्याच महिन्यानंतर पाऊस पडतो. नदी नाल्यांना पूर येतात, विहिरींना नवीन पाणी येतें. या पावसामुळे नवीन जीवजंतु उत्पन्न होतात. ते पाण्याबरोबर आपल्या पोटांत जातात आणि अशा या

रोगजंतुमुळे कॉलरा इत्यादि रोग या दिवसांत हटकून होतात. या रोगावर उपायहि अगदीं सोपा आहे. म्युनिसिपल कमेटीच्या आरोग्याधिकाऱ्यांनी शहरांत हस्तपत्रकें वाटलीं आहेत. तीं तुम्ही वाचलीं असतील. त्यांत फार सोपा उपाय सांगितला आहे. दूध, पाणी उकळून घ्या हा तो साधा उपाय आहे. हें हस्तपत्रक आपण वाचतो पण हा उपाय यत्किंचितहि हयगय न करतां आपण सतत दोन महिने करतो कां ? पहा आपल्या घरीं, शेजारी-पाजारीं ही काळजी घेण्यांत येते कां ? ही काळजी आपण घेतली तर कॉलऱ्याचें नांव सुद्धां ऐकूं येणार नाहीं. मग त्याने मनुष्य दगावण्याचे तर दूरच राहिलें. ही एवढी काळजी आपण घ्यावयाला नको कां ? या हस्तपत्रकांतील सूचनांची अंमलबजावणी आपल्या घरांत होते किंवा नाहीं तें तुम्ही पहा. होत नसेल तर करवून घ्या. त्याकरतां अवश्य तर आग्रह धरा.

तसेंच आंव न होऊं देणें हेंहि बऱ्याच अंशीं तुमच्या हातीं आहे. या दिवसांत तुमची पचनशक्ति मंदावलेली असते. पूर्वी तुम्ही जितकें जेवत होता त्यापेक्षा थोडें कमी जेवत जा. मुख्य म्हणजे ज्या दिवशीं थोडेसें अपचन झालें आहे, पोट दुखतें आहे, पोटांत कोठें खुटखुटतें आहे, असें वाटेल त्या दिवशीं अजिबात जेवूं नका. लंघन म्हणजे न जेवणें हा उपाय अनेक रोगांवरील प्रथम उपाय म्हणून सांगितला आहे. मिताहार व प्रसंगीं लंघन केलें तर 'आंवेमुळे चि. ××× आजारी आहे, सबब तो आज शाळेंत येऊ शकणार नाहीं,' अशी चिठ्ठी पाठविण्याची पाळी तुमच्या पालकांवर यावयाची नाहीं.

ज्या रोगांचा प्रतिबंध आपणाला करतां येतो त्यांचा प्रतिबंध करण्यास तुम्ही मुलांनी आतापासून शिकलें पाहिजे. कधींच आजारी न पडणें, सदा आरोग्यसंपन्न राहणें, हें आपणाला केवढें मोठें भूषण आहे!

२५९३२ २५/३/५

पुरवां सांगितलेल्या बागुलबोवा शद्वांवरून माझ्या मनांत किती तरी विचार आलेत.

अगदीं लहान मुलें रडूं लागलीं कीं त्यांना गुपचुप बसविण्याकरितां तुम्ही त्यांना म्हणता, 'बाहेर बोवा आलाय् बरं कां. जारे बोवा जा, आमची × × गुपचुप बसली आहे आतां.' बाहेर बोवाहि नसतो व तो तुमच्या लहानग्या बहिणीला नेणेंहि शक्य नसतें. पण तुम्ही मात्र तिला बोवाची भीति दाखवून गुपचुप बसवता, जसे त्या लहान मुलीचें तसेंच तुमचेंहि असतें.



मला आठवतें. एका अंधाऱ्या रात्रीं आम्ही जरा उशीरां घरीं जात होतो. दूर रस्त्याचे कांठीं मनुष्याच्या आकृतीसारखे कोणी तरी उभे आहे

असें दिसलें आणि आमची गाळण उडाली. पुढें जाण्याची आमची कोणा-चीच हिंमत होईना. पण थोडासा विचार केला. ठरविलें कीं सर्वांनी मिळून एकमेकांजवळ चालायचें, आणि जणुं कांहींच नाहीं असें समजून येत होत्या त्या कविता मोठमोठ्याने पाठ म्हणत जावयाचें. झालें, आम्ही सर्वांनी निश्चय केला आणि चाललो पुढें. मनांत भीति होतीच पण दाखविली नाही कोणी. थोड्या वेळाने तें बागुलबोवाचें स्थान आलें——आता——? आम्ही पाहिलें, वाळून पडलेल्या झाडाचा भाग होता तो! आम्ही मनांतल्या मनांत खूप वरमलों. पण सांगितलें नाहीं कोणाला. आता तुमच्याकरितां म्हणून तुम्हाला सांगितलें.

आपण उगाचच बऱ्याच गोष्टींना भीत असतो. तसें भिण्यासारखें कांही नसतें. जरा हिंमत धरून पुढें चाललें कीं हें अनुभवास येतें व कांहीं भिण्यासारखें असलें तरी तेंच आपल्या निश्चयास भिऊन पळून जातें.

शेतांतील बुजगावणें

शेतांत पिकें उभीं राहिलीं कीं शेतकरी एक बुजगावणें तयार करतो. एक काठी उभी रोवायची, तिला एक आडवी कांठी बांधायची, त्या आडव्या काठीत शर्टच्या बाह्या अडकवून शर्ट अडकावयाचा, रोंवलेल्या काठीवर एक छोटेसें मडकें पालथें घाला-वयाचे कीं झालें बुजगावणें तयार.

हे बुजगावणें कित्येकांना भेडसावतें.

हे बुजगावणें प्राण्यांना – चोरी करावयास जाणाऱ्या माणसां-नाहि—भेडसावतें. आपण प्रयत्न मार्गावर चालूं लागलों कीं अशीं अनेक बुजगावणीं आपल्यासमोर येतात. त्यांना आपण भिणार का ?

सन्मार्गावर पुढें जाणाऱ्या आम्हा मुलांना असल्या बुजगावण्यांची काय भीति ?

आम्ही पुढें जाणारच आणि प्रसंग पडला तर प्रत्यक्ष खऱ्या संकटांशीहि दोन हात करणार.

काल श्रावण सोमवार होता. संध्याकाळीं लवकरच जेवणें झालीं होतीं. उष्टीं काढणें झाल्यावर आम्ही घरांतील सर्व मंडळी मधल्या घरांत सहज बोलत बसलो होतों. थोड्या वेळाने स्वयंपाकघरांत मला कांहीं खुडबुड ऐकूं आली. माझें सहजच तिकडे लक्ष गेलें. खरकटीं भांडी ज्या कोपऱ्यांत ठेवलीं होतीं त्या कोपऱ्यांत एक मांजर एका भांड्यांत तोंड घालण्याचा प्रयत्न करीत होतें. मी पत्नीला विचारलें' 'कसलें भांडें आहे तें ?' तिनें सांगितलें, 'दूधाचे.' मी त्या मांजराकडे पहात राहिलो. त्या भांड्यांत दुसरें एक भांडें ठेवलें असल्यामुळें मांजराचें तोंड आंत जात नव्हतें. मी पहातच होतो काय करतें तें. त्याने थोड्या वेळाने आपला एक पाय त्या दोन भांड्यांच्या फटीतून आंत घातला, भांड्यांत पाय घासल्यासारखे केलें आणि पाय बाहेर काढून तें मांजर त्या पायाचा पंजा चाटूं लागलें ! हा त्याचा प्रयत्न बराच वेळ चालूं होता. कांहीं वेळाने तें निघून गेलें. मी जाऊन पाहिलें तों तें भांडे अगदीं घासल्या-सारखें चक्क झालेलें !

बोलण्यावरून बोलणें निघालें. पत्नीने पाहिलेली आणखी एक गोष्ट सांगितली. जाळीच्या आलमारींत दुधाचें भांडें ठेवलें होतें. मांजर बाहेर त्या आलमारीभोंवतीं घोंटाळत होतें. त्याने कांहीं वेळांत त्या आलमारीच्या जाळीला कोठें लहानसें छिद्र पडलें आहे तें हेरलें. त्या खोलींत कोणी नाहीं असें पाहून त्या मांजराने त्या छिद्रांतून आपला एक पंजा आंत घातला व त्या दुधाचें भांड्यांत अडकवून तें वांकडे केलें ! झालें, सर्व दूध सांडून बाहेर वाहूं लागलें !! मांजराने ते चटाचट चाटायला सुरवात केली !!!

अशा गप्पा एकदां सुरूं झाल्या कीं त्या वाढतच जातात. जो तो तशाच प्रकारच्या पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टी सांगूं लागतो. आमचे एक शेजारी बसले होते. ते म्हणाले, 'उंदीरमामा अशा वेळीं काय करतात, माहीत आहे तुम्हाला ?' आम्ही म्हटलें, 'सांगा तुम्हीच.'

ते म्हणाले, 'तेलाच्या डब्याचें झांकण बंद तर नव्हते पण निरुन्द होते. उंदराला तेल खूप आवडतें. त्याला तेल प्यावयाचें होतें पण डब्याचें तोंडांतून तोंड घालून तेल पिणें शक्य नव्हते. तेव्हां त्याने डब्याच्या तोंडाकडे पाठ केली. शेंपटी आंत घालून तेलांत बुडविली व ती शेपटी बाहेर काढून तेलांत भिजलेलें शेपूट उंदीर चाटूं लागला !"

मोठें कौतुक वाटलें मला या प्रयत्नवादी उंदरामांजरांचें !

मुंगी ! किती तुच्छ प्राणी हा ! तुच्छता दाखविण्याकरतां आपण या शब्दाचा उपयोग करतो. हो ना?

पण

याच मुंग्यांना आपल्यापेक्षां जास्त वजनाचा तुकडा किंवा मेलेला किडा आपल्या घराकडे ओढत नेताना तुम्ही पाहिले नाहीं कां ? त्यांनीं बांधलेलीं वारूळें तुम्ही पाहिलीं नाहींत कां ? वारूळ बांधणें म्हणजे त्यांच्या जीवाच्या मानानें केवढी मोठी आकांक्षा ! पण त्या ती पूर्ण करतात.

आपल्या केवढयाहि मोठ्या आकांक्षा
दीर्घोद्योग व सहकार्यानें
प्रत्यक्षांत उतरवितां येतात,
हेंच या मुंग्या आपणास शिकवीत नाहींत कां ?

काल आपल्या शाळेंत एक पाहुणे आले होते. जरा उशीरा आले म्हणून तुमची त्यांची भेट करवून देतां आली नाहीं. एकूण शाळेची व्यवस्था कशी काय आहे, हें ते माझ्याबरोबर हिंडून पहात होते. आपली शाळा काय ! जुन्या वाड्यांत भरत असलेली शाळा पण त्यांत फिरत असतां त्यांना मोठें समाधान वाटत असल्याचें दिसलें. वर्गावर्गांतून जातांना त्यांना अगदीं नवीन उद्बोधक वाक्यें फलकावर वाचायला मिळत. त्यांना सर्वांत आश्चर्य वाटलें निरीक्षक कधींहि राहत नाहीं अशा विद्यार्थी-वाचनालयांत त्यांनी पाय ठेवला तेव्हां.

चारसहा बांक व चार दोन टेबलें—तसें साधारणच आहे आपलें वाचनालय; पण टेबलावर असलेलीं वर्तमानपत्रें कोठेंही फाटलेलीं नव्हतीं. त्यांना त्याहीपेक्षा आश्चर्य वाटलें वाचनालयांतील टेबलावर ठेवलेल्या-कांहीं मौल्यवान पुस्तकांचें व Lands and Peoples, Pictorial knowledge सारख्या चित्रमय ग्रंथांचें. ते म्हणाले, तुम्ही हीं पुस्तकें व हे सचित्र-ग्रंथ येथे ठेवतां ! चोरीस जात नाहींत का येथील पुस्तकें व या ग्रंथांतील चित्रें ?'

मी त्या ग्रंथांपैकीं एक ग्रंथ त्यांचे हातांत देत समोरच असलेल्या त्या फलकांकडे त्यांचे लक्ष वेधलें. त्या फलकांवर लिहलें आहे:

आमचें वाचनालय

येथील ग्रथ वाचण्याचा व त्यांतील चित्रें पाहण्याचा आमच्याप्रमाणेंच आमचेमागून येणाऱ्या विद्यार्थ्यांनाहि हक्क आहे. त्यांच्या हक्काची आम्ही योग्य काळजी घेतो, असें हें आमचें वाचनालय.

शाळेतील विद्यार्थी यांतील सूचना लक्षांत घेऊन त्याप्रमाणें वागतात हें पाहून त्यांना साहजिकच फार संतोष वाटला. मलाहि तुमच्या योग्य वागणुकीचा मोठा अभिमान वाटला.

उद्यां तुम्हाला पोळ्याची सुट्टी आहे. फार आनंदाचा हा तुमचा दिवस. नाहीं कां ? तसें पाहिलें तर अलीकडे तुम्हाला सणावारांच्या बऱ्याच सुट्ट्या मिळत आहेत. म्हटलेंच आहे कीं 'पोळा आणि सण झाले गोळा.' पण तुम्हाला पोळ्याबरोबर कसली आठवण होत असेल तर पुरणपोळीची. इतर दिवशीं पुरणाची पोळी न झाली तरी उद्यां होणार हें निश्चितच.

उद्याच्या पोळ्याच्या सणाला इतकें महत्व कां, हें तुम्हाला माहीत आहेच. आपल्या या शेतीप्रधान देशांत आपल्या प्रत्येकाचें जीवनांत शेतीला, व म्हणून शेती पिकविण्यास मदत करणाऱ्या बैलाला अतिशय महत्व आहे. बैल आपणाला अनेक प्रकारें मदत करतो म्हणून बैलांचा हा सण साजरा करून त्याचेबद्दल आपण आपली कृतज्ञता या दिवशीं व्यक्त करतो. हा सण आपण कां साजरा करतो त्याचें हें झालें कारण.

हा सण आपण कसा साजरा करतो हें तुम्हाला माहीत आहेच.

सकाळीं बैलांना नदीवर किंवा विहीरीवर नेऊन स्वच्छ धुवायचे त्यांना रंगरंगोटी करायची, त्यांना सजवावयाचें, दुपारी पुरणपोळी खावयाला घालायची, संध्याकाळी त्यांचे पाठीवर झुली घालून मोठ्या समारंभानें, पोळा भरतो तेथें मिरवीत न्यावयाचे. तेथे पाटील प्रतिष्ठितांचे बैलांनीं तोरण तोडले कीं फुटला पोळा. मग बैलांना घरीं आणावयाचे.

गृहलक्ष्मीनें त्यांची आदरानें पूजा करावयाची अशा प्रकारें आपण हा सण साजरा करतो.

यानंतर बैल मिरवायला निघतात.

आपण हा सर्व समारंभ असा साजरा करतो खरा पण सायंकाळीं मिरवावयाला निघालेल्या या बैलांच्याकडे उद्यां तुम्ही जरा निरखून पहा.

ते हाडाचे सांपळे झालेले दिसतात कीं धष्टपुष्ट दिसतात? तें पहा. किती बैल असे दिसतात कीं ज्यांचेकडे पाहिल्याबरोबर तुम्ही उद्गारता, 'काय मस्त बैलजोडी आहे!'

समोरून येणाऱ्या प्रत्येक जोडीकडे पाहून आपल्या तोंडून जर हे उद्गार निघाले तर पोळा हा सण बैलांविषयीं अवश्य ती कृतज्ञतेची भावना पूर्णपणें सदा मनांत बाळगून आपण साजरा करतो, असें होईल.

आपण कोणताहि उत्सव, सण, समारंभ साजरा करतो, तो वर्षांतून एकदांच करतो; पण तो उत्सव, सण, समारंभ साजरा करण्याचे मागें जी भावना असते ती मात्र आपल्या मनांत सदैव जागृत असली पाहिजे, अन्यथा तो उत्सव, सण, समारंभ साजरा करण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

१९ र. वि. ... ३८७८

एक दिवस एक शिक्षक म्हणत होते, 'मुलांना व्यायामापासून फायदा होतो, हें माहीत असतें, वक्तशीरपणापासून फायदे आहेत, तो अंगीं असावा असेंहि वाटतें, परीक्षेंत पास व्हावयाची इच्छा प्रत्येकालाच असते, असें असून दररोज नियमित अभ्यास त्यांचे हातून होत नाहीं. असें कां होतें व त्यावर त्यांनी उपाय काय करावा यासंबंधीं आम्ही काय सूचना द्याव्या ?' यावर त्या दिवशीं आमची बरीच चर्चा झाली व माझ्याजवळ या बाबतींत जे सांगण्यासारखें होतें तें मी त्यांना सांगितलें.

पण त्या दिवसांपासून मी आजच्या दिवसाची टिळकपुण्यतिथीची वाट पहात होतो. कारण आजच्या पुण्यतिथीच्या दिवशीं तुम्हाला या बाबतींत एक सूचना मी देण्याचें त्या दिवशींच योजलें.

तुम्हाला बऱ्याच गोष्टी कराव्या असें नेहमींच वाटत असतें. त्यापैकी पुष्कळ चांगल्या असतात पण त्या हटकून आपल्याहातून साध्य होतीलच असा आत्मविश्वास तुम्हाला नसतो. अगदीं परीक्षा पास होण्याचेंच उदाहरण घ्या. तुमच्यापैकी प्रत्येकाची इच्छा परीक्षेंत निदानपक्षीं पास तरी व्हावे अशी असतेच असते. पण प्रत्येक जण पास होतोच असें नाहीं व प्रत्येकाने पास होण्याकरितां जो प्रयत्न करावयास पाहिजे असतो तितका प्रयत्न प्रत्येकजण सतत करतोच असें

नाहीं. इच्छित गोष्ट नेहमीं साध्य व्हावीच, असें तुम्हालावाटतें ना ? तर मग आजपासून एक गोष्ट करा.

ती गोष्ट फार क्षुल्लक व सोपी आहे पण लोकमान्य टिळकांचें पुण्य-स्मरण करून ती करा. ती गोष्ट म्हणजे कोणतेहि अगदी क्षुल्लक कमी महत्वाचे वाटणारे दोन नियम करा. त्यापैकी एक नियम असा करा कीं मी अमुक गोष्ट रोज अमुक इतके वाजतां, किंवा अमुक गोष्ट झाल्यानंतर किंवा पूर्वीं करीनच करीन, उदाहरणार्थ सकाळीं उठल्याबरोबर तोंडानें श्रीराम म्हणेन व मग अंथरुणाबाहेर पाय टाकीन, किंवा उठल्याबरोबर घराबाहेर जाऊन एक दगड तो घेऊन रस्त्याच्या दुसऱ्या कडेला फेकीन व मग इतर उद्योगास लागेन.

दुसरा नियम असा करा कीं 'मी अमुक एक गोष्ट एक वर्षपर्यंत तरी मुळींच करणार नाहीं' उदाहरणार्थ, सुपारी खाणार नाहीं, वगैरे.

असे कोणतेहि दोन नियम आज करा व निश्चयानें ते वर्षभर पार पाडा.

केलेले नियम एकहि वेळ न चुकतां निश्चयपूर्वक तुम्ही पार पाडलेत तर सहजच समजेल तुम्हाला मी असे नियम कां करायला सांगतो ते.

थोरांची इच्छा

थोर स्त्रीपुरुषांचें पुण्यस्मरण आपण उचित दिवशीं कृतज्ञतापूर्वक करतो.

ते थोर झाले आणि गेले.

त्यांची जागा कोण भरून काढणार ?

मुलांनो,

ते थोर स्त्रीपुरुष तुमच्याकडे आशापूर्ण दृष्टीने पहात आहेत. तितक्याच, किंबहुना कांकणभर अधिकच, यशस्वीपणें तुम्ही ती जागा भरून काढणार ना ?

मग करा तर प्रयत्न.

तुमचें कार्य त्यांच्या कार्यापेक्षां सरस झाले पाहिजे.

त्यांची इच्छा ?

पुत्रादिच्छेत् पराजयम् । अशीच आहे.

आज १५ आगस्ट आहे. आपल्या भारताच्या जीवनांत या दिनाला किती महत्व आहे हें तुम्हाला माहीत आहेच. अशा पवित्र दिवशीं नवीन नवीन संकल्प करावे व नवीन प्रयोगांना सुरवात करावी असें मी तुम्हाला नेहमी सांगत आलो आहे. अशा दिवशीं आपल्या शाळेंतहि नवीन उपक्रम सुरू करण्याची आपली प्रथा आहे. आज आपल्या पाठशाळेंत दिसण्यांत अगदी छोट्या पण गुणवर्धनाच्या दृष्टीने फार मोठ्या प्रयोगास आपण सुरवात करणार आहो. तो प्रयोग पूर्णपणें यशस्वी करणें हें सर्वस्वी तुम्हां विद्यार्थ्यांवर अवलंबून आहे. मी आतांच तुम्हाला सांगितलें कीं प्रयोग फार सोपा आहे. विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयांतील पुस्तकांचा एकेक संच प्रत्येक वर्गाकरितां मी तयार केला आहे. त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांना समजतील, उपयुक्त होतील अशीं निवडक पुस्तकें प्रत्येक संचामध्यें आहेत. प्रत्येक संचांत वर्गातील मुलांच्या संख्येइतकीं पुस्तकें आहेत. प्रत्येक वर्गात एक मुलगा मी नेमला आहे. या समारंभानंतर सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या वर्गात जावे तेथे हा मुलगा आपल्या वर्गाच्या पुस्तकांचा संच घेऊन येईल त्याचेजवळून सर्वच मुलांनी अर्थातच पाळीने—गडबड किंवा भांडण न करतां---पुस्तकें घ्यावींत. हा मुलगा कोणाचेंही नांव लिहून घेणार नाहीं. त्या मुलाचें काम केवळ पुस्तकें ठेवायचीं व पुस्तकें असतील त्यावेळीं जो कोणी मागावयाला जाईल, त्याला तेव्हां त्यापैकीं जें पुस्तक पाहिजे असेल, तें द्यावयाचें. बस्स ! एवढेंच त्याचें काम. त्यानें पुस्तक कोणाला दिलें, कोणीं आणलें, केव्हां आणलें, कांहीं कोठेहि नोंद ठेवायची नाहीं. विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयाचीं पुस्तकें विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचावींत व आस्थापूर्वक परत करावींत. हींच सर्व पुस्तकें पुढील वर्षी व वर्षानुवर्षी

येणाऱ्या विद्यार्थ्यांनाहि वाचावयाची आहेत हें आपल्या शाळेंतील सर्व विद्यार्थी लक्षांत ठेवतीलच.

चुकून कोणाचे हातून पुस्तक फाटलें किंवा हरवलें तर तसें त्याने त्या मुलाजवळ सांगावें म्हणजे झालें. पुस्तक फाटल्याबद्दल किंवा हरवल्याबद्दल कोणालाहि दंड होणार नाहीं.

या प्रयोगाचा पहिला हप्ता २ आक्टोबर रोजीं–महात्मा गांधी जयंतीचे दिवशीं—पूर्ण होईल. त्या दिवशीं पुस्तकें बदललीं जातील. व दुसरा हप्ता २६ जानेवारी रोजीं पूर्ण होईल.

या प्रयोगाचा एकूण वृत्तांत तुम्हाला ३० जानेवारी रोजीं सांगण्यांत येईल. या सोप्या प्रयोगांत फार मोठा अर्थ भरला आहे. तो कोणता हें जाणून तुम्ही सर्व समजदार विद्यार्थी तो प्रयोग यशस्वी करून दाखवालच असा मला विश्वास आहे.

नदीच्या उगमाप्रमाणें.

कोणत्याहि मोठ्या गोष्टीची सुरवात छोटीच असते.

छोट्या छोट्या गोष्टी करूनच मोठ्या गोष्टी करण्याची पात्रता येते.

लहान मुलेंच पुढें मोठीं होतात.

थोर होण्याकरतां.

लहानपणापासूनच अधिकाधिक चांगल्या व मोठ्या गोष्टी अंगावर घेऊन त्या यशस्वीपणें पार पाडण्याकरता पराकाष्ठा करण्याची संवयच लावून घेतली पाहिजे.

१३

तुम्ही सर्व मुलें आहांत. तुमच्यापैकी पुष्कळांना रस्त्यावर खेळण्याची किंवा टिवल्या बावल्या करीत हिंडण्याची संवय असण्याचा संभव आहे. तुम्ही असें खेळत असतां किंवा रस्त्यानें जात येत असतां तुमच्या पेठेची माहिती नसलेला कोणी इसम कोणाच्या तरी घराची चौकशी तुमच्याजवळ करतो. तुम्हाला तुमच्या खेळांत तो मोठाच व्यत्यय आल्यासारखे वाटते. तुमच्यापैकी कोणी अशा चौकशीकडे लक्षच देत नाहींत तर कोणी त्या माणसाकडे त्रासिकपणें पाहतात. तुमच्यापैकी कोणी तरी, 'काय ? × × × चे घर होय ? चला कीं, मी दाखवितो तुम्हाला तें,' असें म्हणून त्याच्याबरोबर हातांतील खेळ किंवा काम टाकून निघाला आहे कां ?

घर दाखविल्यानंतर किंचित् हांसून तुम्ही त्या माणसाचा निरोप घेतला आहे कां ? पहा करून ही थोडीशी सेवा व त्यावर किंचित् स्मित ! कित्ती समाधान नि आनंद होईल त्याला,——आणि–तुम्हालाहि !!

१४

आज सकाळीं एका निराळ्याच रस्त्याने फिरायला गेलो होतो. रस्त्याच्या बाजूला कांहीं गवळ्यांचीं घरें होतीं. गोठ्यांत एका रांगेने म्हशी बांधल्या होत्या. एका म्हशीसमोर घमेल्यांत दाणावैरण होती व गवळी धार काढीत होता. इतर म्हशी आपापल्या जागीं शांतपणें उभ्या होत्या. एक म्हैस दाणावैरण खात असतां या शेजारच्याच म्हशी अशा अगदीं शांतपणें उभ्या कशा? असा विचार माझ्या मनांत आला.

मी विचार करूं लागलो.

रोजची संवय हें मुख्य कारण असेल कदाचित्. एकी मागून दुसरीला खावटी मिळतेच ही त्यांची खात्री असावी. एकी मागून दुसरीला खावटी, ही गोष्ट त्यांच्या अंगवळणीं पडली असावी, पण ही संवय लावण्यास प्रथम प्रथम गवळीबोवाने आपल्या बडग्याचाहि उपयोग केला असणार.

माझा विचार चालू होताच.

आपल्या पाळीची शांतपणें वाट पाहण्याची संवय आपणांत आहे काय? माझ्यासमोर अनेक दृश्यें आलीत. सिनेमागृहाचें तिकिटघर, रेलवे तिकिटें मिळण्याची खिडकी, एकामागून एक अनेक दृश्यें आठवलीं मला. फार काय! आपल्या शाळेची सुट्टी झाल्याची घंटा झाली कीं जिन्याच्या दाराशी व फाटकाशी दिसणारें दृश्यहि मला आठवलें.

मला वाटलें, 'शिस्तीची ही संवय लागण्यास आपणास जनावरासारखा बडगाच पाहिजे कां?' पुन्हा विचार आला, 'नाहीं, मुलें, माणसें यांना विचार करतां येतो. आपल्या हिताहिताचें काय तें त्यांना समजतें. योग्य शिस्तीने सोय व सभ्यता या दोन्ही गोष्टी सहज साधतात तें त्यांना लवकरच उमजेल. नुसत्या सांगीने ही शिस्त आपलीं मुलें व माणसें पाळतील.'

भित्र्यासारखे कांहीं असलें तरी त्याला निश्चयानें तोंड दिलें कीं तें आपल्या निश्चयास भिऊन पळून जातें असें मी तुम्हाला चार दिवसांपूर्वी सांगितलें. त्याबाबत फार बोधप्रद गोष्ट आज सकाळीं मी पाहिली. पहांटे फिरायला जाण्याचा माझा नियम आहे. आज सकाळीं फिरून परत येतांना मी एक दृश्य पाहिलें. बकरीचें एक लहानसें पिल्लू बाजूच्या मैदानांतून चालत होतें. त्या पिल्लाकडे एक लहानशा कुत्र्याचें लक्ष गेलें. तें कुत्रे त्या बकरीचें अंगावर धावून गेलें. हें पाहून तें बकरीचें पिल्लू जीव मुठींत घेऊन पळत सुटलें. दुसरें एक कुत्रें तेथे होते. त्यानें तें पाहिलें व त्या दोघांनी मिळून त्या बकरीचा पाठलाग सुरू केला. दोनदां तिचा लचका तोडण्याचाहि त्यांनी प्रयत्न केला तेव्हां त्या बकरीने एखाद्या घराचा आश्रय घेण्याचें योजलें. आसरा मिळेल या आशेनें ती जवळच्या घराच्या पडवींत शिरली. पण तेथे कोणीच नव्हते. तेव्हां ती त्या पडवींत कोंडली गेली. तिच्या मागोमाग हीं दोन्हीं कुत्रीं त्या पडवींत शिरलीं. जिवावरच बेतली असें पाहून त्या बकरीनें तोंड वळविलें व मागच्या दोन पायावर उभे राहून त्या कुत्र्यांचा प्रतिकार करण्याकरितां ढुशी देण्याचा आंव आणला. झालें! तीं कुत्रीं जागच्या जागीं थबकलीं. एकाने हळूच तोंड वळविलें, त्याने तोंड वळविल्याचें पाहून दुसऱ्यानेंहि वळविलें आणि दोन्हीं कुत्रीं पडवीबाहेर सटकलीं. क्षणभराने ती बकरीहि बाहेर पडली व आपल्या मार्गानें चालूं लागली. मला मोठी बोधप्रद गोष्ट वाटली ही.

कसें करूं? काय करूं?

या तुमच्या अष्टाक्षरी मंत्रावर एकच उपाय.

सर्व बळ एकवटून भेडसावणाऱ्या संकटांवर हल्ला.

करा हल्ला आणि पहा संकटें कशीं

भुर्कन पळून जातात तीं.

१६

काँहीं दिवसांपूर्वी प्रयत्नशील उंदरामांजरांची गोष्ट मी तुम्हाला सांगितली. ती ऐकून तुम्हाला काय वाटलें तें लिहून द्या असें मी तुम्हाला त्यानंतर एके दिवशीं सांगितलें. पुष्कळ विद्यार्थ्यांनी त्यांना काय वाटलें तें लिहून दिलें आहे. मी ते सर्व कागद काल वाचीत बसलो होतो. तुम्हां बहुतेक सर्व मुलांना त्या गोष्टीपासून दोन गोष्टींचा स्पष्ट बोध झालेला आहे, असें या तुम्ही लिहलेल्या कागदावरून दिसतें. एक म्हणजे प्रयत्न हा केलाच पाहिजे, प्रयत्न केला कीं इष्ट गोष्ट साध्य होतेच. दुसरी गोष्ट प्रयत्न करायचाच व अमुक एक गोष्ट साध्य करावयाचीच असें ठरविलें कीं 'इच्छा तेथे मार्ग' या म्हणीप्रमाणें मार्ग सांपडतोच ही होय.

कांहीं मुलांनी लिहलें आहे, 'या गोष्टीवरून शरीराच्या सर्व अवयवांचा वेळ प्रसंगीं कसा उपयोग होतो व करून घेतां येतों हें या उंदरामांजरांच्या गोष्टीवरून समजलें.'

ही उंदरामांजरांची गोष्ट ऐकून वरच्या वर्गातील संस्कृतच्या एका विद्यार्थ्याला एक संस्कृत श्लोक आठवला तो त्याने लिहला आहे. तो श्लोक असा.

उद्योगः खलु कर्तव्यः फलं मार्जारवद्भवेत् ।
जन्मप्रभृति गौर्नास्ति पयः पिबति नित्यशः ॥

खरोखरच उद्योग नेहमीं करीत जावा, मांजराला फलप्राप्ति होते तशी मनुष्यालाहि फलप्राप्ती होते. मांजरांच्या घरीं जन्मापासून गाय नसते पण मांजर रोज दूध पितेच. असा या श्लोकाचा अर्थ आहे.

तुम्ही पहाल, तुमच्या घरांत मांजराला दूध मिळो न मिळो मांजर रोज येतेच. त्याची तुमच्या घरांत रोज खेप ठरलेलीच असते. फळ मिळो न मिळो त्याचा घरांघरांतून फिरण्याचा क्रम चालूंच असतो. हा श्लोक तुम्हाला शिकवत आहे,

उद्योग करा, फळ मिळतेंच मिळतें !

१७

आता तुमच्या शारीरिक कवायतीची तालीम (प्रॅक्टिस) सुरू आहे 'मार्चिंग'ची ही तालीम तुम्ही करत आहांत.

मैदानावर काल तुमची तालीम घेत असतां मला मुंबईच्या लोकल ट्रेनमध्यें पाहिलेली एक गोष्ट आठवली.

मुंबईच्या मुक्कामांत एकदा दुपारच्या वेळीं मी दादरहून कल्याणला एका लोकलने येत होतो. तुमच्यापैकी जे मुंबईला गेले असतील त्यांना माहीत असेल कीं मुंबईच्या लोकल गाड्यांमध्यें वरती हात धरून उभे राहण्याकरतां वर लोखंडी बार घालून त्यांत हातपकडी (हॅंडग्रिप्स्) अडकविलेल्या असतात. गर्दीच्या वेळीं उतारू या हातपकडींना धरून उभे राहतात.



मी दुपारच्या वेळीं लोकलने जात होतो. त्यावेळीं लोकलमध्यें उतारू फारच कमी होते. मी बसून सहजच वर पाहात होतो. त्या लांबलचक डब्यांतील सर्व हातपकडी एका विशिष्ट दिशेने अगदीं नियमितपणें हालत होत्या. मी त्याकडे पाहत होतो. थोड्या वेळाने गाडी चालतांना

डब्याला एक धक्का बसला, कीं त्या सर्व हातपकडींची हलण्याची दिशा एकदम बदले. सर्व हातपकडी एकदम अगदीं निराळ्या दिशेने हालायला लागत. सर्वच हातपकडी अगदीं एका ओळींत एकाच लांबी-रुंदीच्या होत्या व त्यांचें हें हलणें अगदीं शिस्तबद्ध होतें. थोड्या वेळाने गाडीने किंचित् वळण घेतलें. लगेच सर्व हातपकडींची हलण्याची दिशा बदलली-पुन्हा विशिष्ट दिशेने त्यांचें हलणें सुरू झालें.

जणुं कांहीं सर्वांना खटदिशीं हुकुम मिळे व त्याच क्षणीं त्या सर्व हातपकडीं त्या हुकमाबरहुकुम वागूं लागत. मला फार मौज वाटली मला वाटलें कवायत, परेड व मार्चिंग करणाऱ्या विद्यार्थ्यांनी या हात-

पकडींची ही हालचाल अगदीं पाहण्यासारखी आहे. आज्ञा होताक्षणींच इतकी शिस्तबद्ध हालचाल आपल्या कवायत व समारंभ मैदानावरील विद्यार्थी करतील तर शिस्तीचा किती उत्कृष्ट आदर्श इतर विद्यार्थ्यांपुढें ते ठेवतील !

१८

तुमच्या पहिल्या तिमाही परीक्षेची नोटीस निघून आठ दहा दिवस झाले. आजपासून १५ दिवसांनीं ती परीक्षा सुरू होईल, काल एका वर्गात शिकवीत असतां जें शिकवीत होतो तें चागलें समजून घेणें महत्वाचें आहे असें मी म्हटलें.

माझ्या ध्यानीं मनीं नव्हते. ' महत्वाचे ' हा शब्द कांहीं मुलांच्या लक्षांत एकदम निराळयाच अर्थानें आल्याचें दिसलें. एक मुलगा दुसऱ्याला म्हणाला, ' हा प्रश्न परीक्षेंत येणार बरें कां रे '. मी न ऐकलेसें करून त्याला विचारलें, ' काय म्हणालास तूं ?" तो म्हणाला, ' कांहीं नाहीं, सर '. मी म्हणालों, ' तरी पण सांग कीं. परीक्षेविषयीं कांही बोललास असें वाटतें. '

परीक्षेपूर्वी परीक्षेंत काय येणार हें शिक्षकांच्याकडून अगोदर समजावे अशी मुलांची इच्छा असते. काहीं मुलें मोठ्या कौशल्यानें शिक्षकांना प्रश्न विचारून ही माहिती काढून घेण्याचा प्रयत्न करतात.

कांहीं मुलें सरळच विचारतात, ' महत्वाचें सांगा, सर'.

आम्ही म्हणतो, ' सर्वच महत्वाचें. महत्वाचे नाहीं असें कांहीं शिकविलेंच नाही आम्ही तुम्हाला '.

मुलें म्हणतात, ' तरी पण त्यांतल्या त्यांत महत्वाचें काय तें सांगा, सर. "

मी काल या वर्गातील मुलांना म्हटलें, ' हा प्रश्न परीक्षेंत येईल किंवा नाहीं, हे मला सांगता येणार नाही. पण तुम्हाला पाहिजे असतील तर तुम्ही सांगाल ते सर्व प्रश्न येतील.'

एक मुलगा म्हणाला, ' पहा बरें सर. '

मी म्हटलें, ' पाहावयाचें काय त्यांत? तुम्ही सर्व मुलें मिळून सहा प्रश्न लिहून द्या. मी अगदीं तेच प्रश्न परीक्षेंत घालीन. '

सर्व मुलांत एकदम उत्साह संचरल्याचे दिसलें. एक मुलगा धीटपणें पुन्हां म्हणाला, ' सर, तुम्ही म्हणता, पण आम्ही म्हणूं तेच प्रश्न तुम्ही परीक्षेत घालणार नाहीं, सर. '

मी म्हटलें, 'तुम्ही लिहा येथें प्रश्न आणि अगदी तेंच प्रश्न परीक्षेंत आलेच समजा. 'अगदी गॅरंटी' देतो मी, माझी फक्त एकच अट आहे.'

मुलें म्हणाली, 'कोणती, सर ?'

मी म्हटलें, 'तुम्हां सर्वांना १०० पैकीं १०० गुण मिळाले पाहिजेत.'

मुलें एकदम चिबून गेल्यासारखी झालीं. एकजण म्हणाला, ,नागरिकशास्त्र यासारख्या विषयांत १०० पैकीं १०० गुण कसे मिळणार ?'.

मी म्हटलें, '१०० पैकीं ७५ मिळवा. आहे कबूल ?'

तो इतर मुलांकडे पाहूं लागला. मुलें कांहीं बोलेनात. त्याचा थोडासा निरुत्साह झाल्याचे मला दिसलें.

तितक्यांत एक मुलगा म्हणाला, 'सर्वजण, पास होऊं सर.'

मी म्हटलें, 'अशा परीक्षेंत १०० पैकीं ७५ गुण मिळवील तोच पास.'

मुलें याला तयार होईनात. मी हें शेकडा प्रमाण कमी करून पाहिलें. तरी तयार होईनात. नेहमीचें शेकडा ३३ प्रमाण ठेवायला बरींच मुलें तयार होत आहेत असें दिसलें. पण त्यालाहि तयार न होणारी कांहीं मुलें होतींच.

तुम्हीच प्रश्न ठरविणार, तुम्हीच त्याचें उत्तर लिहणार, मग तुम्हाला शेकडा ७५ गुण कां मिळवता येऊं नयेत ?

मला वाटते तुमची रोजची अभ्यास करण्याची पद्धत, परीक्षे-करतां तयारी करण्याची पद्धत, परीक्षेत उत्तर लिहण्याची पद्धत, या सर्वच बाबतींत अवश्य ती सुधारणा अमलांत आणलीत तर हा आत्मविश्वास तुम्हाला अगदीं सहज साध्य होईल. या दृष्टीनें विचार करा तुम्ही. पुन्हां केव्हां प्रसंगाप्रसंगानें मीहि देईन याबाबत सूचना तुम्हाला.

पण तत्पूर्वी घरींच स्वतःकरतां असा प्रयोग करून पहा. एक प्रश्न घ्या. अभ्यास करा. अगदी पूर्ण गुण मिळतील असें उत्तर तयार करा. लिहा आणि तपासून घ्या. पहा किती गुण मिळाले तें.

असा प्रयोग अगोदर करून पाहिलांत तर मी सांगेन तें चांगलें समजेल तुम्हाला.

चार दिवसांपूर्वी एका वर्गात शिकवायला गेलो होतो. कांहीं शिक्षकांनीं या वर्गांतील दोन मुलांविषयीं एक कठीण प्रश्न माझ्यासमोर टाकला होता. या वर्गांतील दोन मुलें आज दोन-तीन वर्षें आपल्या शाळेंत आहेत. मला सर्वच शिक्षकांनी असें सांगितलें कीं हीं मुलें वर्गात कधींच प्रश्नाचें उत्तर देत नाहींत. शिक्षकांशी या प्रश्नाबल मी चर्चा केली.

हा प्रश्न सोडविण्यास सुरवात करावी या हेतूनेच मी त्या वर्गावर शकवावयास गेलो होतो. शिकवतां शिकवतां अगदीं साधा सोपा प्रश्न त्या दोन मुलांपैकी एकाला विचारला. सर्व मुलें या मुलाकडे पाहूं लागली. तो मुलगा कांहीं बोलण्याचा प्रयत्न करीत नाहींसे पाहून मी त्याला सांगितलें 'प्रश्न अगदीं सोपा आहे. त्याचें उत्तर तुला माहीत आहे. हं तें, तेंच उत्तर आहे, सांग चटकन्.' थोडया वेळाने तो बोलण्याचा प्रयत्न करूं लागला. तेवढ्यांत दोन-चार मुलें हंसली. झालें; बोलण्याचा त्याचा प्रयत्न खुंटला.

त्यावेळीं मी त्या वर्गांतील सर्व मुलांना श्रीमती लक्ष्मीबाई टिळक यांची एक गोष्ट सांगितली. त्यांच्या 'स्मृतिचित्रें' या पुस्तकांत आहे ती. हीं 'स्मृतिचित्रें' छान आहेत. वाचण्यासारखीं आहेत. वाचायला गोडी वाटेल तुम्हाला. त्या स्मृतिचित्रांत एका ठिकाणीं श्रीमती लक्ष्मीबाईंनी आपला एक फार बहारीचा व बोधप्रद अनुभव लिहला आहे. अगदीं सर्व प्रथमच त्यांच्यावर भर सभेंत बोलण्याचा प्रसंग आला. त्या सभेसमोर येऊन व्यासपीठाजवळ उभ्या राहिल्या. पण मनांतल्या मनांत खूप घाबरल्या. त्यांचें तोंडून शब्द निघेना. तुम्हीं मुलें त्या 'नर्व्हस्' झाल्या होत्या म्हणाल नाहीं अशा स्थितीला ? त्या घाबरल्या आहेत म्हणून त्यांचें तोंडून शब्द निघत

नाहीं हें सर्व श्रोत्यांना स्पष्टपणें समजलें तरी पण श्रोते अगदीं शांत होते. एक नव्हे, दोन नव्हे, तीन नव्हे, नऊ मिनिटें श्रोते अगदीं शांत बसले होते. इतक्या वेळाने लक्ष्मीबाईंचा घाबरटपणा नष्ट झाला व त्या अस्खलितपणें बोलूं लागल्या.

लक्ष्मीबाईंनीं लिहलें आहे कीं सभेंत इतका वेळ शांत बसलेल्या श्रोत्यांनीच त्यांना बोलके बनविले. त्या वक्त्या झाल्या, त्याचें सर्व श्रेय या श्रोत्यानांच आहे.

वर्गांत मुलगा उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. त्याने थोडी चूक केली कीं इतर सर्व मुलें हंसतात. त्यामुळे तो प्रयत्न करणेंहि सोडून देतो. कांहीं मुलांचे बाबतींत असें नेहमीं घडलें कीं मग हीं मुलें उत्तर देईनाशीं होतात अशा मुलांचें कायम नुकसान होतें. आपल्या बिटक्या शरीफचें व उंच बॅनर्जीचें असेंच झालें आहे. आपल्या या वृत्तीमुळे आपल्या भावांचें असें नुकसान होऊं देणें चांगले नव्हे असें मी या वर्गांतील मुलांना सांगितलें.

लक्ष्मीबाईंच्या उदाहरणांवरूनच सुचलें म्हणून सांगतो. सभेंत व विशेषतः शाळेच्या वक्तृत्वसभेंत नवखे विद्यार्थी तुमचेसमोर उभे राहून बोलायचा प्रयत्न करतात. त्यावेळींहि तुमची वृत्ति अशी कमालीची सहानुभूतीची पाहिजे. तुम्ही स्तब्ध राहून नवख्या वक्त्याला उत्तेजन दिलें पाहिजे त्यामुळें त्याचे वक्तृत्वगुण वाढण्यास संधि मिळते व तो पुढे उत्तम वक्ता झाल्यास त्याचें खरें श्रेय तुमचेंच असते. सर्वांशी-विशेषतः नवख्या मुलांशीं, 'नर्व्हस मुलांशी' सहानुभूतीनें वागा त्यामुळें ती घाबरणार नाहीत, वर्गांतहि उत्तर देतील, सभेंतहि बोलतील आणि त्यांची प्रगति होईल. तुम्ही शांत बसून हें सहाय्य आपल्या भावांना केलें पाहिजे.

दिवाळीच्या सुट्टीनंतर आज तुम्ही शाळेंत आला आहांत. दिवाळींत जी काय मौज तुम्ही केली असेल ती आता संपल्याबद्दल तुम्हाला थोडेसें वाईटहि वाटत असेल पण आतां यापुढील चार सहा महिन्यांत किती तरी मोठीं कामें तुमच्यासमोर वाढून ठेवलीं आहेत. तीं यशस्वीपणें तुम्ही पूर्ण केलींत तर मला वाटते तुम्हाला जितका आनंद होईल तितका आनंद तुम्हाला आजपर्यंत कधींच झाला नसेल.

याच आठवडयांत विविध खेळांचे आंतरशालेय सामने सुरूं होत आहेत. शाळेने दोन तीन खेळांत मिळविलेलें यश कायम ठेवून वाढवावयाचें आहे. आजपर्यंत, आणि विशेषतः सुट्टींत, तुम्ही खेळाची जी तालीम (प्रॅक्टिस) केली ती आता कसाला लागणार आहे. विद्यालयांच्या वक्तृत्वाच्या व अन्त्याक्षरीच्या (कवितांच्या भंडया) आंतरशालेय स्पर्धा पुढील महिन्यांत आहेत.

आपल्या चार जिल्ह्यांतील सर्व माध्यमिक शाळांचा शिक्षणसप्ताह आपल्या येथे होणार आहे. या सप्ताहांत लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, 'रिले रेस,' दौड, कुस्ती इत्यादि मैदानी व मर्दानी खेळांच्या स्पर्धांबरोबर हस्तलिखित मासिकें, हस्ताक्षर, विविध कलाकृति यांचें प्रदर्शनहि भरणार आहे. या बरोबर नाटयगुण, वक्तृत्व, सांघिक गीतगायन, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादिकांच्या आंतरशालेय स्पर्धा होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विविधगुण विकासाच्या दृष्टीने कोणती शाळा कोणतें व किती कार्य करीत आहे हें सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना समजेल.

अनुक्रम २४८९८
विभाग
क्रमांक
नों. दि. २९/३/८





विविध गुणविकासांचे बाबतींत नवा विक्रम करून नवीन उच्चांक गाठण्याकरितां इतकीं विविध क्षेत्रें तुमच्यासमोर आहेत. या क्षेत्रांपैकी

प्रत्येक क्षेत्रांत आपली शाळा चमकलीच पाहिजे असें तुमच्यापैकी प्रत्येकाला वाटत असणारच.

सर्वांत शेवटीं शाळेचें स्नेहसम्मेलन होणार आहे. गेल्या दोन तीन वर्षांत 'प्रकाश पाहिजे सूर्याचा व शीतलता पाहिजे चंद्राची' या नांवानें दिवाणखान्यांत आपण दाखविलेला दीपांचा इतिहास, भारतीय–दीप–प्रदर्शन व इतर दीप प्रकारांचें प्रदर्शन, हस्तकार्यांत विद्यार्थी मग्न, विज्ञानदर्शन, शरीर सौष्ठव चित्र प्रदर्शन, विद्यार्थी–मार्गदर्शक उक्तींचें दर्शन, असाधारण वाद्य–प्रदर्शन व वादन, पाठशाला–नभोवाणी, आंबराई बिहार, शिबिर–निवास, वन–खेळ, इत्यादि विविध शैक्षणिक व नाविन्यपूर्ण कार्यक्रम स्नेहसम्मेलन प्रसंगी यशस्वीपणें करून दाखवून तुम्ही पालकांच्या, शिक्षकांच्या व शाळांच्या तुमच्याविषयींच्या अपेक्षा फार वाढवून ठेवल्या आहेत. सुट्टींतच कित्येक शिक्षक व पालक यंदा तुम्ही काय करणार असें विचारत होते. मी म्हटलें, 'पहावे आतां शाळेंतील विद्यार्थी काय नवीन कार्यक्रम शोधून काढतात तो.'

शिक्षण सप्ताहांत अनेक स्पर्धांत भाग घेऊन तुम्ही नांव मिळवालच. शिक्षण सप्ताहाचे शेवटीं स्नेहसम्मेलनाचा उत्कृष्ट कार्यक्रम ठरवून तोहि तुम्ही यशस्वीपणें पार पाडाल अशी मला खात्री आहे. विविध क्षेत्रांत नवीन यश संपादन करा. तुमचें ब्रीदवाक्य असूं द्या

पुढें चला.

२१

काल मधल्या सुट्टींत सहजच शाळेच्या तिसऱ्या मजल्यावर गेलो होतो. तेथे एका भिंतीवर कांहींसें लिहलेलें दिसलें. जवळ जाऊन पाहतो तो 'Y. B. Sane V B.' जवळच एक मुलगा उभा होता. त्याला त्याचे नांव विचारलें. तो म्हणाला 'यशवंत बाळकृष्ण.' मी त्याचें लक्ष त्याच्या नांवाकडे वेधले. तो म्हणाला, 'येथे उभा होतो सर, हातांत पेन्सिल होती. लिहलें गेलें, सर."



अगदीं खरें आहे त्याचें म्हणणें: 'लिहलें गेलें सर,' त्याने आपलें नांव मुद्दाम लिहिलें नव्हतें. तो तें लिहीत असतां आपण कांहीं अयोग्य करतो आहे याची जाणीवहि त्याला नव्हती. हातांत पेन्सिल होती, हातांतील वस्तूंशी चाळा करायची पुष्कळांनाच संवय असते. तशी संवय यालाहि होती. आणि म्हणून त्याचे हातून तें नांव लिहिलें गेलें होतें.

अशीं कित्येक मुलें आहेत कीं त्यांना अशी खोडच जडलेली असते त्यांना हातांनी सदा कांहीं तरी चाळा करायची संवयच झालेली असते. हातांत कागदाचा कपटा असेल किंवा ते ठेवतील, त्याच्या घड्या करतील किंवा तो वळतील, घड्या उलगडतील, असें कांहीं तरी सदा चालू असतें.

मुलांना असलेल्या अशा अनेक चाळ्यांपैकी अगदीं विद्यार्थिप्रिय चाळा म्हणजे कंपासपेटींतील डिव्हायडर किंवा सेट्स् स्क्वेअर काढायचा व शिक्षक शिकवत असतां समोरच्या डेस्कवर आपलें नांव कोरायचें ! असल्या चाळ्यांमुळे आपण डेस्क, टेबलें, भिंती किती विद्रूप करतो बरें ! शाळेंतील डेस्कवर शाईने किंवा डिव्हायडरने लिहलेलें नसणें किंवा भिंतीवर पेन्सिलच्या रेघोट्या, नांवें, चित्रें नसणें हें शाळेंतील विद्यार्थ्यांना अत्यंत भूषणास्पद आहे. जेथे विद्यार्थी रोज वावरणार तेथील भिंती स्वच्छ राहणें, ही अगदी अशक्यप्राय गोष्ट आहे असें मानण्यांत येतें. ही गोष्ट तुम्ही दक्षतेने वागून शक्य करून दाखवाल तर शाळेच्या किर्तींत अनुपमेय भर पडेल.

'पेपर फार 'हार्ड' तपासले आहेत.'

'ऊः, तुला माहीत नाहीं, ते मास्तरच फार 'स्ट्रिक्ट' आहेत.'

'यावेळीं मी अभ्यासच केला नव्हता, पुढील वेळीं करूं अभ्यास.'

'अभ्यास केला तर
पास होणे कठिण नाहीं.'

या शेऱ्यांवर पुन्हां एकदा विचार करणें,
अधिक हिताचे होणार नाहीं कां ?

२२

दिवाळीचे सुट्टींत आम्ही कांही शिक्षक एक प्रसिद्ध किल्ला पाहण्यास गेलो होतो. तेथे जे कांहीं अवशेष भाग आहेत, ते पाहत असतां पूर्वी जेथे दरबार भरत असावा अशा एका प्रशस्त दिवाणखान्यांत गेलो. भोंवतालच्या भितीकडे पाहिलें. त्यावर जिकडे तिकडे पेन्सिलने, शाईनें, गेरूने, कोळशाने लहान मोठीं नांवें लिहलेलीं दिसलीं. सर्व भिंती नांवांनी व चित्रांनी चिताडलेल्या होत्या. फार वाईट वाटलें मला.

लहान मोठे लोक किल्ला पहावयास येतात. कांही मोठ्या लोकांना पण बहुतेक मुलांना अमुक किल्ला किंवा तमुक स्मारक आपण अमुक तारखेस पाहावयास आलो होतो हे सर्व लोकांना जाहीर करून ठेवावेसें वाटतें. ते लोक अशा जागीं कोठेतरी, सांपडेल तेथे हातीं सांपडेल त्या साधनाने आपलें नांव व तारीख लिहून ठेवतात. त्यांत त्यांना केवढा तरी मोठेपणा वाटतो ! V.R.P. २३-८-४८ असें कांही तरी कोठेतरी लिहून ठेवलें म्हणजे त्यांना मोठें समाधान वाटतें ! आणि मग एकाने लिहलें कीं लागले त्या टोळींतील सर्वच जण लिहावयाला ! !

या आपल्या प्रवृत्तीमुळें आपण आपलीं जुनीं राष्ट्रीय स्मारकें किती विद्रूप करून टाकलीं आहेत बरें ! त्या स्मारकांविषयीं आपला आदर आपण असा कां व्यक्त करावयाचा ?

मोठ्या उत्सुकतेने व जिज्ञासेने जे परकीय प्रवासी आपलीं अशीं स्मारकें पहावयास जातात त्यांना हें पाहून काय वाटत असेल बरें ? मला अतिशय खेद वाटला या प्रवृत्तीचा.

मला वाटतें ज्या शाळेंतील मुलें नांवें, रेघोट्या, चित्रें न काढतां भिंती अगदी स्वच्छ ठेवतात तीं मुलें विद्यार्थी वयांत व त्यानंतरहि जुनीं स्मारकें, धर्मशाळा, देवालयाचीं आवारें व भिंती सार्वजनिक उपयोगाच्या पवित्र वस्तू कधींच विद्रूप करणार नाहींत. या सर्व गोष्टी इतक्या चांगल्या राहिल्या तर भारतीय विद्यार्थ्यांना व नागरिकांना केवढी भूषणास्पद गोष्ट होईल ती !

२३

शाळेच्या स्नेहसंम्मेलनाच्या कार्यक्रमाचा विचार काल तुमच्या प्रतिनिधीमंडळाच्या बैठकींत चालू होता. 'उद्यान विहार' कार्यक्रम ठरविण्यावर चर्चा चालली होती. मी अर्थातच केवळ निरीक्षक-सल्लागार म्हणून या बैठकींत बसलो होतो. शेवटीं या चर्चेंत हा कार्यक्रम निश्चित झाला. या कार्यक्रमाची चर्चा चालू असतां व आजहि माझ्या मनांत एकच विचार घोळत आहे.

गेल्या वर्षी आपल्या शाळेंत एक प्राध्यापक-वक्ते आले होते. त्यांनी आपल्या भाषणांत दोन तीन गोष्टी सांगितल्या. त्यापैकीं एक गोष्ट या उद्यानविहाराच्या चर्चेच्या वेळीं मला आठवली. हे प्राध्यापक आपल्या उच्च शिक्षणाकरितां लंडनला असतां लंडनला एक मोठा राष्ट्रीय उत्सव समारंभ झाला. त्या उत्सवानिमित्त लंडनच्या एका मोठ्या बागेंत कांहीं समारंभ होता. त्या दिवशीं ती बाग फलाफुलांबरोबरच मुलां--माणसांनी अगदीं फुलून गेली होती. मुलें बागेंत इतस्ततः फिरत होतीं, स्त्रिया-पुरुष त्या समारंभांत मग्न होते. रात्रीं समारंभ संपला. सर्वजण आपापल्या घरीं गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ———

आदल्या दिवशीं सकाळीं समारंभाकरितां बागेंतील गळून पडलेलीं पानें वगैरे झाडून काढून बागवानानें बाग जितकी स्वच्छ केली होती तितकीच स्वच्छ होती. बागेंतील एका फुलाला किंवा पानाला धक्का लागलेला नव्हता.

तुमच्या उद्यान विहाराचे शेवटीं———

बागवानाने विचारलें पाहिजे, 'कोणत्या शाळेचीं मुलें होतीं हीं ? कोणत्याहि झाडाच्या पानाफुलाला धक्का लावला नाहीं मुलांनी.'

सार्वजनिक उद्यानांत कसे वागावयाचे या बाबत असें आदर्श उदाहरण आपल्या शाळेंतील मुलें घालून देतील अशी मला आशा आहे.

२४

काल वर्गांत विद्यार्थ्यांना तपासलेल्या उत्तरपत्रिका देत होतो. एका मुलाला त्यानें उत्तरपत्रिकेंत लिहिलेलें एक वाक्य वाचावयाला व त्यावर क्षणभर विचार करावयास सांगितलें. त्यानें तें वाचलें. तो माझ्याकडे पहात उभा राहिला. मी त्याला विचारलें, 'यांत कांहीं चुकलें आहे कां?'

तो पुन्हां त्या वाक्याकडे पाहूं लागला.

त्याच्या लक्षांत येईना. मी त्याला म्हटलें, 'या ठिकाणीं 'उत्तर गोलार्ध' लिहिलें आहेस. 'उत्तर गोलार्ध' लिहावयाला पाहिजे कीं 'उत्तर ध्रुव' लिहावयाला पाहिजे?'

त्यानें तें वाक्य पुन्हां वाचलें. तो म्हणाला, 'घाईघाईंत झालें, सर.' मी दुसऱ्या मुलाला बोलाविलें. त्याला त्याच्या उत्तरपत्रिकेंतील एक वाक्य वाचावयाला सांगितलें. वाक्य असें होतें.

' त्याने कतर्व्य केलें '

त्याने वाचलें. 'त्यानें कर्तव्य केलें.'

मी म्हटलें, 'जें लिहिलें आहेस तें वाच.'

त्याने पुन्हां पूर्वीसारखेंच वाचलें. मी 'र्व्य' खालीं बोट ठेवलें व पुन्हां वाचावयास सांगितलें. तो वाचूं लागला—आणि त्याच्या लक्षांत आलें कीं आपण ' त्याने कतर्व्य केलें ' असें लिहिलें.

तो खालीं मान घालून उभा राहिला. मी त्याला मग विचारलें नाहीं. त्याला विचारलें असतें तर त्यानेंहि उत्तर दिलें असतें,

'घाईघाईंत झालें, सर,'

अशा घाईघाईंत कित्येक गोष्टी करता तुम्ही आणि त्यामुळें जें तुम्हाला चांगलें येत असतें तें सुद्धां तुम्ही पूर्णपणें बरोबर लिहीत नाहीं. तेव्हां दरवेळीं विचार करून काय लिहावयाचें, कसें लिहावयाचें हे तर ठरवाच पण जें तुम्ही मनांत योजलेंलें असते, तेच लिहिलें आहे किंवा नाहीं तेहि पहात जा. नाहीतर तुम्हाला लिहावयाचे असते एक व प्रत्यक्ष लिहतां दुसरेच. कांहीं वेळां तर जे लिहावयांचे असते त्याच्या अगदीं विरुद्ध लिहता. 'त्यानें न केलें तर—' असें तुम्हाला लिहावयाचे असते पण घाईघाईंत 'न' लिहण्याचे राहून जाते व तुम्ही लिहितां,

'त्यानें केलें तर—' इत्यादि.

उत्तरपत्रिका शिक्षकांना देण्यापूर्वी तपासून पहात जा, असें तुम्हाला शिक्षक सांगतात. पण तुम्ही ही सूचना ध्यानांत घेत नाहीं. त्यामुळें अशा अनेक चुका होतात. उत्तरपत्रिका देण्यापूर्वी ती एकदा उत्तरांत लिहिलेला मजकूर बरोबर लिहला आहे किंवा नाहीं या दृष्टीनें तपासावी, व एकदा शुद्धलेखनाच्या दृष्टीनें तपासावी. जास्त गुण मिळण्यास या सूचनांचा फार उपयोग होतो असें तुम्हाला अनुभवानें पटेल. करून पहा.

मांजराला पकडून कसेंहि फेका,
ते नेहमी पायावरच उभे राहते.
तसेंच तुम्हाला
कोणतेहि संकट आलें तरी त्याला तोंड देण्याकरतां
नेहमी स्वतःच्या पायावर उभे राहतां आलें पाहिजे.

२५

काल एक विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्यांबद्दल तक्रार घेऊन आला. तक्रार अशा प्रकारची होती. या मुलाला त्याच्या वडिलांनीं शाळेंत येतांना पोस्टाचे पेटींत एक अगदीं जरूरीचें पत्र न विसरता टाकण्यास सांगितलें होतें. शाळेंत येण्याचे घाईत तो तें पत्र टाकण्याचे विसरला व त्याचेबरोबर त्याच्या खिशांतील तें पत्रहि शाळेंत आलें. मधल्या सुट्टींत इतर मुलांबरोबर जात असतां खिशांतील हें पत्र त्यानें काढलें. मुलांनी विचारलें, ' हे रें काय ? ' यानें तें पत्र वडिलांनीं त्याला पोस्टांत टाकण्याकरतां दिले होते व शाळेंत येतानाच न विसरता टाकण्यास सांगितलें होते, वगैरे सांगितले. आतां इतक्या उशीरां पत्र पोस्टाचे पेटींत टाकावे कां ? असा या मुलासमोर प्रश्न होता. त्याला एक मुलगा म्हणाला, ' टाक कीं. त्याला काय झालें ? तुझ्या वडिलांना थोडेंच समजणार आहे केव्हां तूं टाकलेंस तें ? '

पत्र ज्याला पोचणार त्यानें पत्र उशीरां मिळाल्याबद्दल लिहिलें तर ?

दुसरा म्हणाला, ' छे, छे, तसें नकोच. सरळ पत्र फाडून फेकून दे. पत्र पोचायला नको आणि पत्र उशीरां मिळाले म्हणून तुझ्या वडिलांना कोणी कळवायला नको. पत्र कां पोहोचलें नाहीं विचारलें तर सांग ' गहाळ झालें असेल ' म्हणून.'

युक्ति नामी होती. पण हा सन्मार्गी मुलगा, याची हिम्मत होईना तसें कांहीं करायला व सांगायला.

हें पाहून तो दुसरा मुलगा म्हणाला, ' अरे त्यांत काय आहे एवढें मोठेंसें ? आण इकडे ते पत्र. आत्तां करून देतो तुझें काम. '

आणि असें म्हणून, त्यानें त्याच्या हातांतून पत्र हिसकलें आणि तें फाटलें.

तुम्ही सन्मार्गावर चालत असतां तुम्हाला असा सल्ला देणारे व व मदतीचा आव आणून कुमार्गावर नेणारे कांही तुमचे ' मित्र ' तुम्हाला भेटतात. अशा मित्रांपासून दोन हात दूर राहत जा.

२६

काल क्रिकेटचा अखेरचा निर्णायक सामना होता. दोन्ही शाळांचीं मुलें प्रचंड संख्येने मैदानावर हजर होतीं. अखेरचा सामना होता आणि शेवटचा गडी खेळत होता. यशापयशांत फक्त चार धावांचें अंतर होते. दोन्ही शाळांचीं मुलें अत्यंत उत्कंठेने सामना पहात होतीं. हातातोंडाशीं आलेलें यश कोणाच्या पदरांत पडणार? प्रत्येक मुलाच्या चेहऱ्यावर हें प्रश्नचिन्ह अगदीं स्पष्ट होतें.

इतक्यांत—

सर्व प्रेक्षक विद्यार्थ्यांची दृष्टी एकदम वर गेली. विनूने मारलेल्या जोरदार टोल्याने चेंडू झपाट्याने वर वर चालला होता.

आणि थोडक्या क्षणांत तो तितक्याच वेगाने खालीं येऊं लागला होता.

पुढे काय होणार?

सर्वजण अगदीं निस्तब्धपणें पहात होते आणि खेळाडूंच्या हृदयाने तर अगदीं ठाव सोडला होता. धांवा काढण्याचे सोडून विनू व त्याचा सवंगडी चेंडूवर दृष्टी रोखून थबकले होते.

इतक्यांत टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. शेकडो टोप्या, रुमाल हवेंत उंच उडाले. 'ब्रेव्हो विजय' 'थॅंव रे पठ्ठे' असे ध्वनि सर्वत्र निघाले व बांध फुटलेल्या पाण्याच्या लोंढाप्रमाणें मुलें रिंगणांत घुसलीं. एका क्षणांत एका मोठ्या उंच मुलाने विजयला खांद्यावर घेतला व हा घोळका विजयाच्या आरोळ्या मारीत आपल्या तंबूकडे निघाला.

विरुद्ध बाजूचीं मुलें चांगलीच खट्टू झालीं होतीं. जोराने लगावलेला चेंडू हवेंत किती उंच उडाला होता ! तो कोठे पडणार याचा अंदाज कोणालाच नव्हता. 'लॉंग'वर खडा पहारा देणारा विजय—पण तो किती दूर होता. विजयश्रीची माळ हेलकावे खात होती. विजय नेहमीप्रमाणें अगदीं तय्यार होता. धनुष्यांतून सुटलेल्या बाणानें तुटलेला तारा वरच्यावरा गांठावा तसा विजयने 'कॅच' घेतला. त्याच्या चपळाईनें व कौशल्यानें त्याची शाळा अखेरच्या सामन्यांत विजयी झाली.

दुसऱ्या शाळेचीं मुलें म्हणत होतीं, ' कांहीं हरकत नाहीं. पुढच्य वर्षी जिंकू. कसा मारला होता टोला ! विनू म्हणजे कंकय्या नायडूच जसा. '

यश किंवा अपयश हा प्रश्न नाहीं. खेळा—निराश होऊं नका, दमांत उखडूं नका. खेळा.

क्रिकेट प्रिय इंग्लंडचे लोक म्हणतात, 'Play up, Play up and play the game.'

नेहमीं लक्षांत असूं द्या.

केवळ १८–१९ वर्षें वयाच्या जनकोजी शिद्यानें मृत्युशय्येवर असतां त्याला यमसदनीं पाठविणाराला उत्तर दिलें होतें,

' जिएँगे तो और भी लढेंगे. '

आतां हिंवाळा सुरु होत आहे. शरीर कमाविण्याच्या दृष्टीने सर्व ऋतूंत हिंवाळा हा ऋतू सर्वांत उत्तम असतो. तुम्हां सर्व विद्यार्थ्यांचें वाढतें वय आहे. तुम्ही कालच्यापेक्षां आज एका दिवसाने वाढला आहांत पण तुमची बुद्धि, तुमचें शरीर, तुमचें मन कालच्यापेक्षा आज वाढलें आहे का? या तीहींची वाढ व्हावी या करतां तुम्ही जाणून बुजून निश्चित प्रयत्न केला आहे कां? उत्कर्ष इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यानें असा प्रयत्न निष्ठापूर्वक करायला हवा.

आयुष्यांत वयाच्या पंचविसाव्या वर्षांपर्यंतच शरीराची वाढ होऊं शकते. तोपर्यंत शरीर सुदृढ, बलसंपन्न व डौलदार बनविण्याचा तुम्ही जितका प्रयत्न कराल तितका तो यशस्वी होईल. त्यानंतर प्रयत्न करूनहि शरीराची वाढ तुम्हाला करतां येणार नाहीं. तेव्हां शरीरवाढीच्या दृष्टीने ही पहिली पंचवीस वर्षें अत्यंत महत्वाचीं आहेत हें लक्षांत ठेवा. त्यांतून तुमच्यापैकी कोणाचीं दहा तर कोणाचीं बारा तेरा वर्षे गेलीं आहेत. आतां तुमची शरीरवाढ करतां येण्यासारखीं कितीं वर्षे शिल्लक आहेत याचा हिशेब करा व त्यांचा उत्कृष्ट उपयोग करून शरीर संपन्न करा.

तुमच्या आयुष्यांत तुमच्याजवळ जर कोणती एक गोष्ट अखेरपर्यंत टिकणार असेल तर तें तुमचें शरीर. म्हणून शरीरसंपन्न करण्याचे दृष्टीने यापुढील आयुष्यांत प्रत्येक दिवशीं न चुकतां प्रयत्न करा.

हा प्रयत्न म्हणजे रोज सकाळीं उठून नियमित व्यायाम करणें हा होय. व्यायाम तर नेहमीच करायला पाहिजे पण त्यांतहि हिंवाळ्याचे चार महिने तर करायलाच पाहिजे. तज्ज्ञांचें असें मत आहे कीं चार महिने जरी नियमित व्यायाम केला तरी शरीर बारा महिने आरोग्यसंपन्न राहूं शकतें.



शरीर बलसंवर्धनाचे व अंगांत रग येण्याचे दृष्टीनें सर्वांत उत्कृष्ट व्यायाम म्हणजे दंड बैठका, जोडी व करेला फिरविणें, कुस्ती खेळणें, मल्लखांब करणें हे होत.

जे व्यायाम नियमितपणें केले म्हणजे शरीराची सुडौल वाढ होते व शरीर आरोग्यसंपन्न राहण्यास मदत होते, ते व्यायाम शिकविण्याचा वर्ग पुढील सोमवारपासून आपल्या शाळेंत सुरु होणार आहे. हा वर्ग रोज पहांटे साडेपांच ते साडेसहा भरेल. या वर्गातील मुलांना ५॥ ते ६ आम्ही शिकवूं ते व्यायामयोग (exercises) करावे लागतील. त्यानंतर १५ मिनिटे विद्यार्थी सांघिक खेळ खेळतील व पुढील १५ मिनिटांत कांही वेळ विश्रांति घेऊन त्यानंतर भिजविलेले हरभरे व त्याबरोबर गूळ, किंवा मीठ खाऊन हीं मुलें आपापल्या घरीं ६॥ वाजतां जातील. या वर्गाची माहिती तुम्ही सर्वजण आपल्या पालकांना करून द्या व या वर्गात येण्याची परवानगी घ्या.





जे विद्यार्थी शाळेपासून दूर राहतात म्हणून शाळेंत पहांटे येऊं शकणार नाहींत त्यांनी घरीं किंवा व्यायामशाळेंत जाऊन नमस्कार, दंड–बैठका व इतर व्यायामयोग (exercises) करावेत व शरीर कमवावे. शरीर कमावण्याचा तुमच्या आयुष्यांतील हा काळ आहे. या काळांत शरीर कमाविण्याचा प्रयत्न करून शरीर संपन्न व सुडौल करा.

IRBK-0103818

अनुक्रम
विभाग
क्रमांक
वै. दि.